


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला

■ वर्ष १५ ■ अंक २६६ ■ रविवार, दि. ५ एप्रिल २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

# भोंगा वाजणार, टीव्ही-मोबाईल बंद होणार !

## धाराशिवचा डिजिटल डिटॉक्स पॅटर्न



प्रतिनिधी ५ एप्रिल

**धाराशिव :** मोबाईल आणि टीव्हीच्या अतिवापरामुळे विद्यार्थ्यांचे अभ्यासाकडे होणारे दुर्लक्ष रोखण्यासाठी धाराशिव जिल्हा परिषदेने एक धाडसी आणि कौतुकास्पद पाऊल उचलले आहे. जिल्ह्यात आता 'संध्याकाळी ७ ते ९' हा वेळ अभ्यासासाठी राखीव ठेवण्यात येणार असून, या काळात संपूर्ण गाव टीव्ही आणि मोबाईलचा वापर थांबवणार आहे.

### काय आहे नवा 'अभ्यास पॅटर्न'?

जिल्हा परिषद अध्यक्षा अर्चना पाटील यांनी जाहीर केलेल्या या उपक्रमाची मुख्य वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेतः

१.दररोज संध्याकाळी सात वाजता गावात भोंगा वाजवला जाईल. हा भोंगा म्हणजे मुलांसाठी अभ्यासाची आणि पालकांसाठी टीव्ही बंद करण्याची 'अलार्म बेल' असेल.

२. हा निर्णय केवळ कागदावर राहू नये, यासाठी प्रत्येक गावाला एक अधिकारी दत्तक दिला जाईल. तसेच शिक्षण निरीक्षक आणि ग्रामस्तरीय अधिकाऱ्यांचे पथक गावात गस्त घालून प्रत्यक्ष पाहणी करेल. ३. धाराशिव जिल्ह्यातील सर्व ७६० ग्रामपंचायतींमध्ये हा उपक्रम राबवण्यात येणार आहे. ४. केवळ टीव्ही बंद करून न थांबता, शाळांमध्ये पुन्हा 'सेमी-इंग्लिश' पॅटर्न आणि विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी विशेष 'वाचन मोहीम' राबवली जाणार आहे.

### 'मुलांच्या भविष्यासाठी दोन तास त्याग करा'

मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी दिवसातील केवळ दोन तास टीव्हीचा त्याग करावा. हे केवळ प्रशासकीय काम नसून एक सामाजिक चळवळ असल्याचे त्यांनी नमूद केले. 'हा उपक्रम म्हणजे लोकसहभागातून शैक्षणिक क्रांती घडवण्याचा प्रयत्न आहे. पालकांनी घराघरात अभ्यासाचे वातावरण निर्माण केल्यास जिल्ह्याचा निकाल नक्कीच सुधारेल.'

**– अर्चना पाटील,**
अध्यक्षा, जिल्हा परिषद धाराशिव

# यंदा प्रथमच परीक्षा काळात होणार विद्यार्थी मोजणी!



प्रतिनिधी ५ एप्रिल

**अकोला :** शाळांनी संचमान्यतेत नोंदविलेली वर्गनिहाय पटसंख्या आणि प्रत्यक्षातील विद्यार्थी यांची खातरजमा करण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला आहे. त्या अनुषंगाने ११, १५ व २२ एप्रिल रोजी अधिकारी एकाचवेळी संपूर्ण राज्यात पटपडताळणी करणार आहेत. यापूर्वी शाळा सुरु असताना पटपडताळणी व्हायची, यंदा पहिल्यांदाच परीक्षा सुरु असताना विद्यार्थ्यांच्या उपस्थितीवरुन पटसंख्या मोजली जाणार आहे.

या पार्श्वभूमीवर अकोल्यासह राज्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील इयत्ता दुसरी ते नववी आणि अकरावीच्या वर्गातील पटसंख्या पडताळली जाणार आहे. तसे शिक्षण उपनिरीक्षक, शिक्षण उपसंचालक कार्यालय अमरावतीचे पत्र २ एप्रिलला प्राप्त झाले आहे. पटपडताळणीसाठी शिक्षण उपसंचालक व शिक्षणाधिकाऱ्यांकडून पथके नेमली जाणार आहेत. या मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी शिक्षणाधिकाऱ्यांवर राहणार आहे. पडताळणीवेळी शाळांमध्ये उपस्थित असलेली पटसंख्याच संचमान्यतेसाठी ग्राह्य धरली जाणार आहे. गैरहजर विद्यार्थ्यांची स्वतंत्र चौकशी करून ते नेमके कोणत्या शाळेचे आहेत, याचीही खातरजमा केली जाणार असल्याचेही सदर पत्रात नमूद करण्यात आले आहे.

### असे आहेत शिक्षण संचालकांचे आदेश

इयत्ता अकरावीच्या अंतिम सत्राच्या परीक्षेदरम्यान मराठी, इंग्रजी व भौतिकशास्त्र पेपरच्या दिवशी पटपडताळणी करावी. इयत्ता दुसरी ते आठवीतील विद्यार्थ्यांची उपस्थिती 'पॅट' परीक्षेच्या दिवशीच पडताळावी. इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांची उपस्थिती संबंधित 'पॅट' दिवसांतच तपासावी; त्या दिवशी मराठी, गणित व इंग्रजी विषयांचे पेपर ठेवावेत. अकरावीचे मराठी, भौतिकशास्त्र व इंग्रजी पेपर अनुक्रमे ११, १५ व २२ एप्रिल रोजी घेण्यासाठी वेळापत्रक तयार करून विद्यार्थ्यांना कळवावे. पटपडताळणीनंतर मुख्याध्यापक, क्लस्टर हेड, गटशिक्षणाधिकारी व शिक्षणाधिकारी यांच्या लॉगिनवरून माहिती भरावी, असे आदेशात नमूद आहे.

### एकाच विद्यार्थ्याच्या दोनदा नोंदणीच्या तक्रारी

संचमान्यतेत आपल्या शाळेतील शिक्षक अतिरिक्त होऊ नयेत किंवा नवीन पदे भरता यावीत, यासाठी काही ठिकाणी एकाच विद्यार्थ्यांची नोंद दोन-तीन शाळांमध्ये केल्याच्या तक्रारी शिक्षण विभागाकडे आल्या आहेत. त्यामुळे राज्यात एकाच दिवशी शाळांमधील पटपडताळणी करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, त्यातून पटसंख्येतील बनवेगिरी उघड होणार आहे. यात दोषी आढळणाऱ्या शाळांवर कार्यवाही करण्यात येईल, असेही आदेशात नमूद आहे.

# पिंग शुन' जहाज पुन्हा भारताकडे वळले!

वृत्तसंस्था ५ एप्रिल

**नवी दिल्ली :** इराणकडून ७ वर्षांनंतर येणाऱ्या पहिल्या तेलवाहू जहाजाबाबत निर्माण झालेला संभ्रम अखेर दूर झाला आहे. हे जहाज चीनकडे वळल्याच्या आणि पेमेंटच्या अडचणीच्या चर्चा सोशल मीडियावर रंगल्या होत्या, मात्र भारत सरकारच्या पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने या बातम्या फेटाळून लावल्या आहेत. ६ लाख बॅरल कच्चे तेल घेऊन 'पिंग शुन' हे जहाज भारताच्याच दिशेने येत असून ते लवकरच गुजरातच्या वडीनार बंदरात दाखल होईल, असे सरकारने स्पष्ट केले आहे.

जहाजाच्या 'बिल ऑफ लॅंडिंग'मध्ये (पावती) अनेकदा डेस्टिनेशन बदलण्याची सोय असते. पिंग शुन हे जहाज ऑपरेशनल लवचिकतेसाठी चीनचे सिग्नल देत होते, मात्र त्याचे अंतिम लक्ष्य भारताचे वडीनार बंदर हेच आहे.

# सर्पदंशाने साक्षीचा मृत्यू

**बुलढाणा :** बुलढाणा जिल्ह्यात सर्पदंशामुळे एका १९वर्षीय युवतीचा करूण अंत झाला आहे. यामुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. बुलढाणा जिल्ह्यातील लोणार तालुक्यातील देऊळगाव कुंडपाळ येथे ही घटना घडली आहे. ही युवती शुक्रवारी रात्री आपल्या घरात झोपली होती. त्यावेळी रात्री झोपेतच तिला विषारी सर्पदंश झाला. सर्पदंश झाल्याने या युवतीचा मृत्यू झाल्याची घटना ४ एप्रिल रोजी सकाळी ८ वाजता उघडकीस आली.

# बारामतीच्या पोटनिवडणुकीत.... काँग्रेस सुनेत्रा पवारांविरोधात कोणता चेहरा देणार

प्रतिनिधी ५ एप्रिल

**बारामती :** राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या बारामती विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणूक होत आहे. येत्या २३ एप्रिल रोजी बारामती मतदारसंघात पोटनिवडणुकीसाठी मतदान होईल. तर ४ मे रोजी या पोटनिवडणुकीचा निकाल जाहीर केला जाईल. अजित पवार यांच्या निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेसकडून राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार ही निवडणूक लढवणार आहेत. सुरुवातीला ही निवडणूक बिनविरोध होईल, अशी चर्चा होती. मात्र, आतापर्यंत १९ उमेदवारांनी बारामती पोटनिवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरल्याने बिनविरोधची शक्यता जवळपास मावळली आहे. काँग्रेसने सुरुवातीपासूनच बारामती पोटनिवडणूक लढवण्याची भूमिका घेतली होती. त्यासाठी काँग्रेस पक्षाचा उमेदवार सोमवारी आपला उमेदवार अर्ज दाखल करेल. मात्र, काँग्रेस सुनेत्रा पवार यांच्याविरोधात कोणाला रिंगणात उतरवणार, याची उत्सुकता सर्वांना होती. या उमेदवाराचे नाव आता जवळपास निश्चित झाल्यात जमा आहे. महाविकास आघाडीचा भाग असलेल्या ठाकरे गट आणि शरद पवार गटाने बारामती पोटनिवडणुकीत सुनेत्रा पवार यांना पाठिंबा देण्याचे ठरवले आहे. मात्र, काँग्रेस सुरुवातीपासूनच ही निवडणूक लढवण्यावर ठाम आहे. बारामती पोटनिवडणुकीसाठी उमेदवार म्हणून काँग्रेसकडून अर्चना पाटील, आकाश मोरे, वैभव बुरुंगले, रोहीत बनकर, डॉ. विजयकुमार पिसे यांच्या नावांची चर्चा सुरु होती.

# अशोक खरात प्रकरणांमुळे पीडित महिलांना मानसिक धक्का!

## इंटरनेटवर व्हिडीओ व्हायरल झाले, ओळख उघड होत असल्याने त्रास



### अशोक खरातचा मुलगाही पळून गेला?

अशोक खरात प्रकरणाचा तपास करत असलेल्या विशेष तपास पथकाला (एसआयटी) एक मोठा धक्का बसला आहे. अशोक खरात याचा मुलगा हर्षवर्धन हा फरार झाल्याची माहिती समोर आली आहे. काही दिवसांपूर्वीच अशोक खरात याच्या मुलाची पोलिसांनी ताब्यात घेऊन चौकशी केली होती. यानंतर त्याला घरी सोडण्यात आले होते. मात्र, आता त्याचा फोन नॉट रिचेबल असल्याने तो पळून गेल्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. अशोक खरात याची पत्नी कल्पना खरात यापूर्वीच फरार झाली आहे.

प्रतिनिधी ५ एप्रिल

**नाशिक :** नाशिकमधील विकृत भोंदूबाबा अशोक खरात याने लैंगिक अत्याचार केलेल्या अनेक महिलांची मनस्थिती सध्या प्रचंड बिघडल्याची माहिती समोर आली आहे. गेल्या काही दिवसांमध्ये अशोक खरातच्या केबिनमधील काही व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. या व्हिडीओंमध्ये अशोक खरात या महिलांशी लैंगिक संबंध ठेवताना दिसत आहे. यापैकी अनेक व्हिडीओंमध्ये महिलांचे चेहरे दिसत असून बहुतेक महिलांची ओळख उघड होत आहे. पोलिसांनी गुन्हा दाखल करण्याचा इशारा देऊनही हे व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल करण्यात आले होते. या सगळ्यामुळे पीडित महिलांना जबर मानसिक धक्का बसल्याची माहिती आहे.

अशोक खरात प्रकरणातील आठ ते नऊ पीडित महिलांनी मानसोपचार तज्ज्ञांची भेट घेतल्याची माहिती आहे. अशोक खरात याच्यासोबतचे व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर या महिला सध्या प्रचंड नैराश्याच्या भरात असून त्यांना एकटे पडल्याची भावना सतावत आहे. या प्रकरणात नेमण्यात आलेल्या विशेष तपास पथकाकडून महिलांना कोणतेही दडपण घेऊ नये, तसेच त्या पूर्णपणे सुरक्षित असल्याची ग्वाही देण्यात आली आहे. तसेच तुम्हाला न्याय नक्की मिळेल, असे आश्वासनही देण्यात आले आहे. या प्रकरणात पीडित महिलांची ओळख उघड होऊ नये, यादृष्टीने खबरदारी घेण्यासोबत पोलिसांकडून या महिलांची चौकशी अज्ञातस्थळी केली जात आहे.

# माहूर श्रीदत्त शिखर संस्थानचे महंत मधुसूदन भारती महाराज यांचे निधन

प्रतिनिधी ५ एप्रिल



**नांदेड:** जिल्ह्यातील माहूर तालुक्यातील श्री दत्त शिखर संस्थानचे महंत प. पू. मधुसूदन भारती महाराज यांचे शनिवारी सायंकाळी निधन झाले. वयाच्या ९५ वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाने असंख्य भक्तगण शोकसागरात बुडाले आहे. दरम्यान, त्यांच्या पार्थिवावर आज धार्मिक विधीनुसार अंत्यसंस्कार करण्यात येणार असून, संस्थानतर्फे पुढील कार्यक्रमांची माहिती लवकरच जाहीर केली जाणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

महंत प. पू. अच्युत भारती महाराज हे वैकुंठवासी झाल्यानंतर प. पू. मधुसूदन भारती महाराज हे सन १९७८ साली संस्थानच्या धार्मिक प्रक्रियेनुसार गादीवर विराजमान झाले होते. अत्यंत साधेपणा, अध्यात्मिक चिंतन आणि भक्तीभावासाठी ओळखले जात होते. महाराजांच्या प्रवचनांमधून त्यांनी अध्यात्म, नैतिक मूल्ये आणि संस्कार यांचा संदेश भाविकांपर्यंत पोहोचवला. त्यांच्या निधनाची बातमी समजताच माहूर व परिसरातील भाविकांनी दत्त शिखराकडे धाव घेत अंतिम दर्शनासाठी मोठी गर्दी केली. अनेक संत, महंत, तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी श्रद्धांजली अर्पण केली.

# पाकची भारताला पुन्हा पोकळ धमकी!

वृत्तसंस्था ५ एप्रिल

**सियालकोट :** पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांना युद्धज्वराने पछाडले आहे. अफगाणिस्तानच्या तालिबान्यांनी त्यांच्या नाकात दम आणलेला आहे. तर यापूर्वी ऑपरेशन सिंदूरमुळे पाकचे मोठे नुकसान झाले आहे. आता आसिफ यांनी भारताला पोकळ धमकी दिली आहे. जर भविष्यात दोन्ही देशात संघर्ष उद्भवला. तर पाकिस्तान मुंबई, दिल्लीच नाही तर कोलकात्यावरही हल्ला करेल, अशी बडबड त्यांनी केली. ख्वाजांचे वक्तव्य दोन्ही देशातील तणाव वाढवणारे मानले जात आहे. त्याला आता भारताकडून काय उत्तर मिळते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.४ एप्रिल रोजी सियालकोटमध्ये माध्यमांशी त्यांनी संवाद साधला. त्यांनी भारताने आता कोणतेही साहस करू नये, नाहीतर त्यांचे पूर्वेतील सर्वात मोठे शहर कोलकात्यावर आम्ही थेट हल्ला करू अशी पोकळ धमकी त्यांनी दिली.

# एक डबा वगळून पंचवटी एक्स्प्रेस रवाना!

**मुंबई:** छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) येथून पंचवटी एक्स्प्रेस (गाडी क्र. १२१०९) एक डबा वगळून मनमाडच्या दिशेने रवाना करण्यात आली. एक्स्प्रेसच्या महिला सर्वसाधारण डब्यातील चाकात तांत्रिक बिघाड निर्माण झाल्याने मध्य रेल्वेने हा निर्णय घेतला. या गोंधळामुळे सीएसएमटीहून सायंकाळी ६.१५ वाजता रवाना होणारी पंचवटी रात्री ८.११ वाजता रवाना करण्यात आली. गाडीला एक डबा कमी असल्याने दादर, कल्याणमधील प्रवाशांनी नाराजी व्यक्त केली.




# विदर्भातील पाच वाघ पुन्हा सह्याद्रीत सोडणार!

प्रतिनिधी ५ एप्रिल

**अमरावती :** विदर्भातील व्याघ्र प्रकल्पांमध्ये वाघांची संख्या क्षमतेपेक्षा जास्त झाल्याने आता वनविभागाने मोठ्या हालचाली सुरू केल्या आहेत.

यापूर्वी प्रायोगिक तत्त्वावर पाठविलेले तीन वाघ सह्याद्रीच्या वातावरणात उत्तमरीत्या रमल्यानंतर, आता पुन्हा विदर्भातून पाच वाघ सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात पाठविण्याची तयारी सुरू झाली आहे. त्याकरिता राष्ट्रीय व्याघ्र प्राधिकरणाची परवानगीसुद्धा मिळाली आहे.



सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात वाघांचे अस्तित्व नगण्य झाले होते. मात्र, निसर्गसाखळी कायम राखण्यासाठी तिथे वाघ असणे गरजेचे आहे. विदर्भात विशेषतः पेंच आणि ताडोबात वाघांची संख्या झपाट्याने वाढल्याने प्रादेशिक वर्चस्वासाठी वाघांमध्ये झुंज होतात. हे टाळण्यासाठी आठ वाघांना टप्प्याटप्प्याने पश्चिम महाराष्ट्रातील सह्याद्रीच्या जंगलात सोडले जाईल. यापूर्वी पाठविलेले वाघ तिथे 'रमले' असल्याने वनविभागाचा आत्मविश्वास वाढला आहे. सह्याद्रीत २५ ते ३० वाघांचे संगोपन होऊ शकते, असे नियोजन आखले आहे.

सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात वाघांची संख्या वाढली की, मुंबई, पुणे, ठाणे, कर्नाटक या भागांतून पर्यटकांना वाघ बघण्याची संधी सहज उपलब्ध होईल. येत्या काही दिवसांत पेंच आणि ताडोबा व्याघ्र प्रकल्पातून पाच वाघांचे स्थलांतर होणार असल्याची माहिती आहे. त्याकरिता सह्याद्रीतून उपवनसंरक्षक, सहायक वनसंरक्षकांची चमू गत आठवड्यात विदर्भाचा दौरा करून गेली.

### वनविभागाचे धोरण काय?

विदर्भातील अतिरिक्त वन्यजीवांचे इतरत्र स्थलांतर करून नैसर्गिक संतुलन राखणे. तसेच मानव-वन्यजीव संघर्ष कमी करण्यासाठी 'हॉटस्पॉट'मधील प्राणी हलविणे आणि स्थलांतरित केलेल्या प्रत्येक वाघावर 'रेडिओ कॉलर'द्वारे नजर ठेवली जाणार आहे.

विदर्भातील व्याघ्र संवर्धन जागतिक स्तरावर कौतुकास्पद आहे. मात्र, वाढती संख्या व्यवस्थापित करण्यासाठी सह्याद्रीसारख्या सुरक्षित अधिवासात त्यांचे पुनर्वसन करणे हाच सर्वोत्तम पर्याय आहे. 'एनटीसीए'ने आठ वाघांची परवानगी दिली होती, त्यापैकी तीन वाघ सह्याद्रीत पाठविले आहेत.

**- एम. एस. रेड्डी, प्रधान**
मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महाराष्ट्र



# वैद्यकीय शिक्षणाचा प्रवास : संघर्षातून यशाकडे

## आंबेडकरी समाजाचे योगदान



१४ एप्रिल हा दिवस संपूर्ण देशासाठी अभिमानाचा आणि प्रेरणेचा आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या विचारांची आणि कार्याची आठवण करताना, शिक्षण क्षेत्रातील विशेषत: वैद्यकीय क्षेत्रातील आंबेडकरी समाजाचा प्रवास अधोरेखित करणे अत्यंत महत्त्वाचे ठरते.

७० च्या दशकात वैद्यकीय शिक्षणामध्ये आंबेडकरी समाजातील विद्यार्थ्यांची उपस्थिती अत्यल्प होती. यामागे अनेक कारणे होती—तीव्र दारिद्र्य, शिक्षणाबद्दलची अनभिज्ञता, मार्गदर्शनाचा अभाव आणि शैक्षणिक संस्थांमध्ये असलेले वर्चस्ववादी वातावरण. विज्ञान शाखेत आवश्यक गुण मिळवणे कठीण जात असल्याने अनेक विद्यार्थी पारंपरिक शिक्षणाकडे वळत असत. तथापि, बाबासाहेबांच्या विचारांमुळे समाजात शिक्षणाची जाणीव निर्माण होऊ लागली. 'शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे' या त्यांच्या संदेशाने पालकांना प्रेरणा दिली. अत्यंत हालअपेष्टा सहन करत, कष्टाने मुलांना शिकवण्याचा निर्धार समाजाने केला आणि हाच बदलाचा पाया ठरला.

शिक्षणाचा प्रसार वाढताच विद्यार्थी गुणवत्तेने पुढे येऊ लागले. शासनाच्या आरक्षण धोरणामुळे व्यावसायिक शिक्षणाचे दरवाजे खुलले. हळूहळू मेडिकल, डेंटल, आयुर्वेद आणि इतर क्षेत्रांमध्ये आंबेडकरी विद्यार्थ्यांचा प्रवेश वाढू लागला. परंतु या प्रवासात अपमान, भेदभाव आणि मानसिक छळ यांचा सामना करावा लागला. याच पार्श्वभूमीवर विद्यार्थी संघटनांची गरज भासली. विविध महाविद्यालयांमध्ये संघटनांची उभारणी झाली आणि त्यातून विद्यार्थ्यांना संरक्षण व मार्गदर्शन मिळू लागले. याच विचारातून 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मेडिकोज असोसिएशन' सारख्या संघटनांची स्थापना झाली. या संघटनांनी केवळ विद्यार्थी हित जपले नाही, तर सामाजिक बांधिलकीची जाणीवही जागवली. कालांतराने या विद्यार्थ्यांमधून तज्ज्ञ डॉक्टर घडू लागले. त्यांनी ग्रामीण भागात आणि वंचित वस्त्यांमध्ये आरोग्य शिबिरे आयोजित करून समाजसेवेचा नवा आदर्श निर्माण केला. वैद्यकीय सेवा ही केवळ व्यवसाय न राहता सामाजिक कर्तव्य बनली.

या परिवर्तनाच्या प्रवाहात प्रा. डॉ. किशोर उमरे यांचे कार्य विशेष उल्लेखनीय आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून त्यांनी आयुर्वेद शिक्षण घेतले. संस्कृत विषयाची कोणतीही पार्श्वभूमी नसतानाही त्यांनी परिश्रम आणि जिद्दीच्या जोरावर विद्यापीठात प्रावीण्य मिळवले. नागपूर येथील आयुर्वेद महाविद्यालयात त्यांनी शिक्षण घेत असताना, आपल्या समाजातील विद्यार्थ्यांसाठी संघटन उभारण्याचा धाडसी निर्णय घेतला. प्राध्यापकांचे मार्गदर्शन नसतानाही त्यांनी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आयुर्वेद मेडिकल असोसिएशन'ची स्थापन केली. या संघटनेच्या माध्यमातून महाराष्ट्रभर शाखा उभारण्यात आल्या, आरोग्य शिबिरांची मालिका सुरू झाली, हजारो रुग्णांना मोफत उपचार मिळाले. १९८० मध्ये नागपूर दीक्षाभूमी येथे भव्य आरोग्य महाशिबिराचे आयोजन करण्यात आले. हे सर्व कार्य केवळ वैयक्तिक यश नव्हते, तर समाजासाठी केलेले महान योगदान होते, एक प्रकारचा त्याग आणि समर्पण.

आज परिस्थिती पूर्णपणे बदललेली आहे. आंबेडकरी समाजातील विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर वैद्यकीय शिक्षण घेत आहेत. देश-विदेशात उत्कृष्ट डॉक्टर, संशोधक आणि तज्ञ निर्माण होत आहेत.परंतु या यशामागील संघर्ष विसरता कामा नये. आजच्या पिढीसमोर नवीन जबाबदारी आहे. समाजातील वंचित घटकांपर्यंत आरोग्य सेवा पोहोचवणे आणि बाबासाहेबांच्या विचारांना कृतीत उतरवणे. १४ एप्रिलच्या या पावन दिनी, आपण केवळ बाबासाहेबांना अभिवादन न करता त्यांच्या स्वप्नातील समतामूलक समाज घडवण्याचा संकल्प करूया. वैद्यकीय क्षेत्रातील आंबेडकरी समाजाचा हा प्रवास. संघर्षातून उभारी घेणारा आणि सेवाभावाने उजळणारा, निश्चितच प्रेरणादायी आहे.

रंजना किशोर उमरे
उमरे, अकोला

# वाघामुळे ज्ञानगंगा अभयारण्याच्या समृद्धीत वाढ

## व्याघ्र दर्शनासाठी पर्यटकांची वाढती गर्दी



जिल्ह्याला समृध्द वनसंपदेत भर टाकणारी घटना समोर आली आहे. वन्यजीव विभागाने अन्न साखळीतील प्रमुख घटक असलेला वाघ ज्ञानगंगा अभयारण्यात सोडला. त्यामुळे बुलढाणा- खामगाव रस्त्यालगत असलेल्या बोथा घाटात वाघोबाची डरकाळी ऐकायला मिळत आहे. पांढरकवडा अभयारण्यात जन्माला आलेल्या तथा नागपूर येथील पेंच व्याघ्र प्रकल्पातील पीकेटी ७ सीपी १ नावाच्या तीन वर्ष वयाच्या नर वाघाला ज्ञानगंगा अभयारण्य क्षेत्रात मुक्त संचार करत आहे. पर्यटकांची संख्या देखील वाढली आहे.

बोथा घाटातून वाहने येता जाता वाघाची डरकाळी ऐकू येते. हा अनुभव अनेक जण घेत आहेत. या परिसरावर निसर्गाची उधळण आहे. त्यात आता या वाघामुळे अधिक भर पडली आहे. वाघाच्या ओढीमुळे पर्यटकांची पावले अभयारण्याच्या दिशेने पडत आहेत.

हा वाघ अवघ्या सहा महिन्याचा असतानाच त्याच्या आईचा मृत्यू झाला होता. त्यानंतर या वाघासह त्याच्या बहिणीला पेंच व्याघ्र प्रकल्पात देखरेखीखाली ठेवले होते. गेल्या तीन वर्षात या वाघाने शिकार करणे तसेच जगण्यासाठी आवश्यक असलेले सर्व कौशल्य पेंच व्याघ्र प्रकल्पात प्राप्त केले. पीकेटी ७ सीपी १ या वाघाला ज्ञानगंगा अभयारण्य मध्ये पाच हेक्टर क्षेत्रात देखरेखी खाली ठेवण्यात आले आहे. त्याच्या हालचालीवर ट्रॅप कॅमेरे तसेच सीसीटीव्ही कॅमेऱ्याची नजर ठेवण्यात येत आहे. वन्यजीव विभागाचे विभागीय वन अधिकारी, कर्मचारी वाघाच्या हालचालींवर लक्ष ठेवून आहेत.

सूरज बोराखडे
खामगाव

# वाडेगावचे चित्रकार इब्राहिम शेख–मनसब





उपजत कलेला सौंदर्य आणि कलात्मकतेची जोड देऊन अभिव्यक्तीचा सुंदर संगम घडवत येथील प्रसिद्ध चित्रकार तसेच वरिष्ठ पत्रकार इब्राहिम शेख-मनसब उत्तमोत्तम कलाकृती निर्माण करतात. देवदेवता, महापुरुषांची, निसर्ग सौंदर्य विविध चित्रांच्या माध्यमातून त्यांनी कला जोपासली आहे. कलावंत म्हणून त्यांनी स्थान निर्माण केले आहे.

रामनवमीच्या पूर्वसंध्येला प्रभू श्रीरामांचे आकर्षक चित्र स्वतःच्या हाताने रेखाटले. त्यांच्या या कलाकृतीचे अकोला जिल्ह्यासह परिसरात सर्वत्र कौतुक झाले. सामाजिक सलोखा आणि सांस्कृतिक एकात्मतेचा संदेशही यातून त्यांनी दिला आहे. इब्राहिम शेख-मनसब हे अनेक वर्षांपासून चित्रकलेच्या माध्यमातून विविध सामाजिक, धार्मिक व ऐतिहासिक विषयांवर प्रभावीपणे हस्तकलेने कलाकृती साकारत आहेत. रामनवमीच्या निमित्ताने त्यांनी प्रभू श्रीरामांचे शांत, तेजस्वी आणि भक्तिभाव जागवणारे चित्र कॅनव्हासवर आपल्या हाताने उतरवले आहे. त्यांच्या कुंचल्यातून साकारलेल्या या चित्रात श्री रामांचे तेज, संयम आणि मर्यादा पुरुषोत्तमाचा भाव अत्यंत जिवंतपणे उमटलेला दिसतो.

या कलाकृतीमागे समाजात सद्भावना, परस्पर आदर आणि संस्कृतीप्रती प्रेमाचा संदेश देण्याचा हेतू असल्याचे इब्राहिम शेख-मनसब यांनी सांगितले. 'कला ही माणसांना एकमेकांना जोडणारी शक्ती आहे. विविध धर्म-संस्कृतींचा सन्मान राखत ऐक्याचा संदेश या निमित्ताने त्यांनी समाजात पोहोचविला आहे .ते कलाकार म्हणून आपले कर्तव्य आहे,' असेही त्यांनी नमूद केले.

दरम्यान, रामनवमीच्या पूर्वसंध्येला त्यांनी तयार केलेल्या या चित्राचे स्थानिक नागरिक, कलाकार आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांकडून विशेष कौतुक होत आहे. एका मुस्लिम कलाकाराने प्रभू श्रीरामांचे चित्र साकारून दिलेला हा संदेश समाजातील बंधुभाव अधिक दृढ करणारा असल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली. त्यांच्याकडे चित्रांचा खजिना आहे. गेली कित्येक वर्षे कलेची सेवा ते करीत आहेत. हसतमुख आणि मितभाषी इब्राहिम शेख समाजात विशिष्ट स्थान प्राप्त करून आहेत.

शेख चांद
पत्रकार, बाळापूर.
संवाद : ९९७५०००५००

# ऊर्जा स्वावलंबनाचा आमच्यासाठी धडा

## इतरांवर अवलंबून राहणे सोयीस्कर नाही

*अमेरिका-इस्त्राईल व इराण यामधील युद्धाने 'उर्जेत' स्वावलंबी होणे किती आवश्यक आहे, हे आपल्या सर्वांना अधिक चांगल्या रीतीने कळून चुकले. देशाला स्वातंत्र्य मिळून ७८ वर्षे होऊनही अजूनही भारत ऊर्जेसाठी इतर देशांवर अवलंबून आहे. आज भारतात एकूण ऊर्जा वापराच्या तुलनेत आयात केलेल्या ऊर्जेचा वाटा हा ३५ टक्क्यांहून (२०२३) अधिक आहे, जो १९९० मध्ये १० टक्के होता. भारत कच्चा तेलासाठी अंदाजे ८७ टक्क्यांपेक्षा जास्त व नैसर्गिक वायूसाठी ५० टक्क्यांपेक्षा जास्त आयातीवर अवलंबून आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात परकीय चलन खर्च होते. तसेच ऊर्जा सुरक्षा आणि धोरणात्मक स्वायत्ततेसाठी आव्हानात्मक परिस्थिती निर्माण होते. सध्या त्याचे मुख्य कारण जागतिक तेलाच्या बदलत्या किमती व भू-राजकीय तणाव. यावर मात करण्यासाठी सन २०४७ पर्यंत सौर, जैव इंधन व हरित हायड्रोजन सारखा स्वच्छ, अक्षय आणि तांत्रिक दृष्ट्या स्वदेशी ऊर्जेचा अवलंबून करून भारत उर्जेबाबत स्वावलंबी बनण्याचे स्वप्न बघत आहे. काय हे स्वप्न पूर्ण होईल?*

*जगभरात अल्बेनिया, भूतान, नेपाळ, पॅराग्वे, आइसलँड, इथिओपिया, व कॉंगो या सात देशांमध्ये निर्माण होणारी जवळपास सर्वच वीज ही अक्षय ऊर्जा स्त्रोतांतून, म्हणजे सौर, पवन, जल आणि भूऔष्णिक अपारंपारिक स्त्रोतांपासून निर्माण होते. आपण पण पारंपरिक स्त्रोतांऐवजी अपारंपारिक स्त्रोतांपासून वीज निर्मिती करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करत आहोत. विकसित भारत - २०४७ हे लक्ष्य गाठण्यासाठी सातत्याने आगामी वर्षांत भारताचा विकास व आर्थिक वाढ मोठ्या प्रमाणात होणे गरजेचे आहे. त्यासाठी 'उर्जा' आव्हानांना सामोरे जाऊन त्यावर मात करणे अत्यावश्यक असेल. ऊर्जेसाठी इतर देशांवरील अवलंबित्व कमी करणे आवश्यक आहे. त्यासाठी अक्षय उर्जा निर्माण करण्यासाठी पायाभूत सुविधांचा विकासाबरोबरच उर्जा निर्मितीसाठी मोठया प्रमाणात गुंतवणूकीची आवश्यकता आहे. जीवाश्म इंधन आयातीतून एका बाजूला परकीय चलन मोठ्या प्रमाणावर खर्च होते तर दुसरीकडे ते जाळण्यापासून होणाऱ्या कार्बन उत्सर्जनाचे दीर्घकालीन परिणाम पर्यावरण व आरोग्यावर होतात. त्यामुळे सौर ऊर्जा, जैव इंधन व हरित हायड्रोजन ऊर्जा क्षेत्रावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक ठरते.*



भारत एक कृषिप्रधान देश आहे, त्यामुळे शेतीचे अवशेष, जे जैव इंधन उत्पादनासाठी स्वदेशी संसाधन आहे, ते भारतात अंदाजे ५० कोटी टन उपलब्ध होते. ते बायो-सीएनजी, बायो-डिझेल आणि इथेनॉल सारख्या स्वदेशी ऊर्जा स्वतःमध्ये रूपांतर करणे शक्य आहे. ५० कोटी टन बायोमासपासून अंदाजे ७५,००० ते १,००,००० मेगा वॅट वीज निर्माण करता येते.त्यामुळे एका बाजूला जीवाश्म इंधनाची आयात कमी होऊ शकते तर दुसऱ्या बाजूला शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढून शेतीतील कचरा व्यवस्थापित करण्यास व प्रदूषण कमी करण्यात मदत होऊ शकते.बायोमास प्रकल्प स्पर्धात्मक ऊर्जा खर्च देतात, जी साधारणपणे २.२५ ते ३.२५ रुपये प्रति किलोवॅटच्या दरम्यान पडते. बायोमास ऊर्जेची क्षमता २०२३ मधील १०.३ गीगावॅट वरून २०३० पर्यंत १४.९७ गीगावॅट पर्यंत वाढण्याचा अंदाज आहे. ग्रीन हायड्रोजन पासून वीज निर्मिती हा ऊर्जा क्रांतीचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ मानला जातो. नूतनीकरणयोग्य विजेचा (सौर/पवन) वापर करून इलेक्ट्रोलायझरमध्ये पाण्याचे

हायड्रोजन आणि ऑक्सिजन मध्ये विघटन केले जाते. तयार झालेला हायड्रोजन वायू म्हणून साठवला जातो, जो ऊर्जा साठवण्याचा एक उत्तम मार्ग आहे.हायड्रोजन थेट जाळून गॅस टर्बाइनच्या साहाय्याने वीज निर्मिती करता येते.

ग्रीन हायड्रोजन उत्पादनाचे जागतिक केंद्र बनण्याची भारतामध्ये प्रचंड क्षमता आहे; २०३० पर्यंत ५ दशलक्ष मेट्रिक टन वार्षिक उत्पादनाचे उद्दिष्ट भारताने ठेवले आहे.कमी खर्चाची नवीकरणीय ऊर्जा आणि सरकारी प्रोत्साहनांमुळे, २०३० पर्यंत हा ग्रीन हायड्रोजन निर्मितीचा खर्च प्रति किलो ३५० रुपये प्रति किलो वरून १०० रुपये खाली घसरण्याचा अंदाज आहे.

'स्वदेशी २.०' अंतर्गत उर्जा क्षेत्रात आत्मनिर्भरता मिळवण्यासाठी सौर उर्जा, जैव इंधन आणि ग्रीन हायड्रोजन या तीन मुख्य स्तंभांवर भर दिला जात आहे. २०२५ च्या अखेरीस, भारताने आपल्या एकूण स्थापित वीज निर्मिती क्षमतेपैकी अंदाजे ५१.३७ टक्के क्षमता, सौर, पवन, जल आणि अणुऊर्जेसह इतर जीवाश्म-इंधन-विरहित स्त्रोतांपासून प्राप्त करून एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला. एकूण क्षमतेचा हा मोठा हिस्सा व्यापणारी ही कामगिरी, भारताने आपल्या सन २०३० च्या उद्दिष्टांच्या पाच वर्षे आधीच साध्य केली.भारताची एकूण स्थापित वीज क्षमता (ऑक्टोबर २०२५ पर्यंत) ५,०५,०२३ मेगावॉट इतकी होती,, त्यापैकी २,४५,६०० मेगा वॅट जीवाश्म-इंधन स्त्रोतांपासून आणि २,५९,४२३ मेगा वॅट बिगर-जीवाश्म इंधन स्त्रोतांपासून (यात २,५०,६४३ मेगा वॅट नवीकरणीय ऊर्जा स्त्रोतांचा समावेश आहे) आहे.

नवीन अहवालानुसार, भारतातील सौर ऊर्जेची एकूण अंदाजित क्षमता १०,८३० गीगावॅट निश्चित करण्यात आली आहे, यात जमिनीवर उभारलेल्या प्रणालींपासून ४,९०९ गीगावॅट, कृषी-सौर प्रणालींपासून ४,१७७ गीगावॅट, छतांवरील प्रणालींपासून ९६० गीगावॅट आणि तरंगत्या सौर प्रणालींपासून १०० गीगावॅट यांचा समावेश आहे. सरकारच्या मोठ्या अनुदानामुळे आणि वर्षाकाठी ३०० हून अधिक दिवस मिळणाऱ्या सूर्यप्रकाशामुळे, सौरऊर्जा महत्त्वपूर्ण दीर्घकालीन बचतीची संधी देते; विशेषतः निवासी सौर यंत्रणांचा खर्च अनेकदा अवघ्या ३ ते ५ वर्षांतच वसूल होतो.

२०४७ पर्यंत ऊर्जा क्षेत्रात आत्मनिर्भर होण्याच्या भारताच्या उद्दिष्टांपुढे अनेक महत्त्वपूर्ण अडथळे आहेत. सर्वात महत्त्वाचे म्हणजे उच्च भांडवली खर्च आणि तंत्रज्ञानातील तफावत. नवीकरणीय ऊर्जेसाठी पायाभूत सुविधा, बॅटरी साठवणूक आणि हरित हायड्रोजनसाठी मोठ्या गुंतवणुकीची आवश्यकता आहे, तसेच लिथियम आणि सौर मॉड्यूल्ससारख्या कच्च्या मालासाठी आयातीवर लक्षणीय अवलंबित्व आहे. अनियमित सौर/पवन ऊर्जेचे व्यवस्थापन करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर ऊर्जा साठवणुकीची गरज आहे. त्यासाठी पारेषण व वितरण कंपन्यांची आर्थिक परिस्थिती मजबूत असणे गरजेचे आहे. तसेच, भारतात ९७ टक्के सौर/पवन ऊर्जा निर्मिती काही राज्यांमध्ये केंद्रित आहे, ज्यामुळे राष्ट्रीय वितरणासाठी लॉजिस्टिकल अडथळे निर्माण होत आहेत.तसेच दुसरे महत्त्वाचे म्हणजे यासाठी दीर्घकालीन गुंतवणूक आकर्षित करणे. त्यासाठी गुंतवणूकदारांसाठी सुलभ, आकर्षक व अनुकूल धोरणात्मक चौकट/योजना आखणे गरजेचे.

आज भूराजकीय तणावामुळे, गॅस पेट्रोल आणि इतर जीवनावश्यक वस्तूंची टंचाई यासारख्या अडचणीला आपल्याला सामोरे जावे लागत आहे. पण या सर्वांवर मात करण्याची जबाबदारी फक्त सरकारची ही अपेक्षा बाळगणे कितपत योग्य? एक जबाबदार नागरिक म्हणून आपली काही जबाबदारी आहे की नाही? आपल्याकडे सार्वजनिक वाहतुकीसाठी वापरल्या जाणाऱ्या इंधनातील ९० टक्के, स्वयंपाकाच्या गॅस पैकी (एलपीजी) ६६ टक्के आणि नळाद्वारे घरपोच पोचवल्या जाणाऱ्या वायूतील ५० टक्के गरज ही केवळ आणि केवळ आयातीवर अवलंबून आहे या खरेदीसाठी जवळपास १७,६०० कोटी डॉलर्स खर्च होतात. हा आयातीचा खर्च कमी करण्यात भारतीय नागरिक हातभार लावू शकतात. आपण गॅस सिलिंडर किंवा पेट्रोल/ डिझेलचा गरजेपेक्षा जास्त साठा करणे टाळू शकतो. अनावश्यक ठिकाणी स्कूटर व चारचाकी याने भटकंती टाळू शकतो. सार्वजनिक वाहतुकीचा जास्तीत जास्त वापर करू शकतो.तसेच एकाच गाडीतून स्वतः जाण्यापेक्षा इतरांना त्याच्यात सामावून घेण्याचा प्रयत्न करू शकतो.स्वयंपाकात गॅसचा वापर प्रयत्नपूर्वक कमी करू शकतो. जास्तीत जास्त कार्यालयीन कामे व शिक्षण हे ऑनलाईन पद्धतीने करू शकतो. वीजेचा वापर जबाबदारीने करू शकतो.बचत केलेली ऊर्जा हीच निर्माण केलेली ऊर्जा होय. आपल्याकडे नैसर्गिक संसाधनांचा विचार करून आपले जीवन अधिक शाश्वत व स्वावलंबी बनवण्यासाठी दीर्घकालीन उपाय शोधण्याच्या दृष्टीने आपण पण देशाचे नागरिक म्हणून आत्मचिंतन करणे गरजेचे आहे.

प्रा. संजय त्रिंबकराव खडक्कार
माजी तज्ज्ञ सदस्य, विदर्भ वैधानिक विकास मंडळ मो : ७२७६६१४२६०

# फक्त कार्डिओ केल्यानेच वजन कमी होते का?

आजकाल फिटनेसबाबत लोक खूप जागरूक होत आहेत. जिम, स्पोर्ट्स, ग्राउंड ॲक्टिव्हिटीज, झुंबा, डान्स इत्यादी अशा अनेक फिजिकल ॲक्टिव्हिटीजमध्ये लोक सहभाग घेत आहेत.पण जिम करणाऱ्या लोकांमध्ये अनेक गैरसमज आढळतात, त्यापैकी एक मोठा गैरसमज म्हणजे: 'फक्त कार्डिओ केल्यानेच वजन कमी होते.' विशेषतः जे लोक लवकर वजन कमी करण्यासाठी जिम सुरू करतात, त्यांच्यामध्ये हा गैरसमज जास्त प्रमाणात दिसतो.ष्पण वजन कमी करण्यासाठी फक्त कार्डिओ करणे ही पद्धत पूर्णपणे चुकीची आहे. कार्डिओ म्हणजे काय आणि त्याचा खरा उपयोग काय? कार्डिओ म्हणजे मुख्यतः आपली स्टॅमिना वाढवण्याचे काम करते. न थकता आणि कुठलीही अडचण न येता करता येणारी शारीरिक क्रिया कार्डिओ व्यायामामुळे मोठ्या प्रमाणात सुधारते. कार्डिओला हृदयासाठी उपयुक्त/हार्ट फ्रेंडली असेही म्हटले जाते, कारण कार्डिओमुळे शरीरामध्ये थकवा न येता सतत ऑक्सिजनयुक्त रक्तपुरवठा सुधारण्यास मदत होते. ऑक्सिजनयुक्त रक्तपुरवठा जितक्या चांगल्या प्रकारे शरीराच्या प्रत्येक भागापर्यंत पोहोचते, तितकाच त्या भागाचा पोषण चांगल्या प्रकारे होतो. कारण शरीरातील प्रत्येक पोषक घटक योग्य ठिकाणी पोहोचवण्याचे काम रक्त करते. म्हणूनच, जितके चांगले पोषक घटक शरीराला मिळतील, तितकाच शरीराचा विकास चांगल्या प्रकारे होतो. रनिंग, सायलिंग, झुंबा, एरोबिक, स्विमिंग, जॉगिंग, इत्यादी हे कार्डिओचे काही चांगले प्रकार आहेत.

**लोकांची एक सामान्य चूक :** बऱ्याच लोकांचा जास्त भर वजन काट्यावर दिसणाऱ्या आकड्यांवर असतो. ते तासन्तास कार्डिओ करून, शरीरातून भरपूर घाम काढून, लगेच वजन तपासतात. पण इथे एक महत्त्वाची गोष्ट लक्षात घेणे गरजेचे आहे घाम येणे म्हणजे चरबी कमी होणे असे नसते. घाम येणे म्हणजे शरीरातून पाण्याचे प्रमाण कमी होणे, आणि ते पुन्हा पाणी घेतल्यावर परत भरून निघते.

**कार्डिओ चांगला आहे – पण एकटाच पुरेसा नाही**

कार्डिओ हा हृदय आणि फुफ्फुसांच्या आरोग्यासाठी अत्यंत चांगला व्यायाम प्रकार आहे, यात काही शंका नाही.कार्डिओ करताना काही प्रमाणात कॅलरी खर्च होतात, त्यामुळे वजन कमी होण्याच्या प्रक्रियेला मदत होते.पण फक्त कार्डिओ करून कधीही योग्य पद्धतीने वजन कमी होऊ शकत नाही. योग्य आणि दीर्घकाळ टिकणाऱ्या वजन कमी करण्यासाठी, कार्डिओ सोबत खालील गोष्टी तितक्याच महत्त्वाच्या आहेत.

**वेट ट्रेनिंग :** योग्य आहार/चांगले न्यूट्रिशन नियमितपणा

या सर्व गोष्टी एकत्र पाळल्यावरच योग्य पद्धतीने आणि सुरक्षितरित्या वजन कमी होऊ शकते. योग्य विचार काय असावा? फक्त वजन कमी करणे हे लक्ष्य नसून, योग्य पद्धतीने चरबी/फॅट कमी करणे हे खरे लक्ष्य असले पाहिजे. म्हणूनच, कार्डिओ हा वजन कमी करण्याचा एक महत्त्वाचा भाग आहे, पण तो एकटाच संपूर्ण उपाय नाही. कार्डिओ सोबत वेट ट्रेनिंग व्यायाम आणि योग्य आहार यांचा समतोल ठेवणे हेच वजन कमी करण्याचे योग्य आणि शास्त्रीय तत्त्व आहे.



गणेश अंभोरे
फिटनेस प्रोफेशनल अँड न्युट्रीशनिस्ट अकोला

## साहित्यिक, लेखकांना आवाहन

**दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट** आता आठ पानांसह वाचकांना उपलब्ध होत आहे. अंकातील विविधा पानासाठी अकोला शहर तसेच जिल्ह्यातील साहित्यिक, लेखक, कवी यांनी त्यांचा मजकूर **८३९०६७०९९९** या **व्हॉटसअप** क्रमांकावर पाठवावा. त्याला यथायोग्य प्रसिद्धी दिली जाईल.

सिटी न्यूज अकोला

रविवार, दि. ५ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# बाभुळगाव जहाँ सर्कलमध्ये रब्बी पिकांचे मोठे नुकसान, वीज पुरवठा ठप्प

**अकोला :** अकोला पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या बाभुळगाव जहाँ सर्कलमधील गावांमध्ये ३० मार्च २०२६ तसेच २ व ३ एप्रिल रोजी सायंकाळी ७ वाजताच्या सुमारास सुसाट वाऱ्यासह झालेल्या अवकाळी पावसाने अक्षरशः हाहाकार माजवला आहे. या अचानक आलेल्या नैसर्गिक संकटामुळे परिसरातील रब्बी पिकांसह फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत.

बाभुळगाव जहाँगीर, कुंभारी, मासा, उदेगाव, डोंगरगाव, येवता, सिसा, बोंदरखेड, हिंगणा कुंभारी या गावांमध्ये गहू, हरभरा, कांदा, भाजीपाला तसेच विविध फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. जोरदार वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी शेतातील विजेचे खांब कोसळले असून वीजतारा तुटल्याने अनेक तासांपासून वीज पुरवठा खंडित झाला आहे. परिणामी, आधीच पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांपुढे आणखी अडचणी उभ्या ठाकल्या आहेत.

## मारवाडी महिला समितीचे गोरक्षण संस्थान मध्ये गोग्रास वितरण



**अकोला:** मारवाडी समाजाच्या सामजिक व महिला सेवेत सक्रिय असणाऱ्या अ भा मारवाडी महिला समितीच्या स्थानीय शाखेच्या वतीने गोरक्षण रोड येथील गोरक्षण संस्थान मध्ये गोमाताना गोग्रास वितरण उपक्रम राबविण्यात आला.समिती अध्यक्ष संध्या अग्रवाल यांच्या पुढाकारात संपन्न या गोग्रास वितरण मध्ये संस्थान मधील १५० गोमाताना गोग्रास वितरित करून त्यांचे सामूहिक पूजन कर करण्यात आले.या गोग्रास मध्ये गुड, कुटार हिरवा चारा होता. हनुमान जयंतीच्या पूर्व संधेवर आयोजित या उपक्रमात समितीच्या अध्यक्ष संध्या अग्रवाल,रीता बगड़िया, राधा खंडेलवाल,प्रिया नरेड़ी आदी उपस्थित होत्या.

## संतांची भगवंताला मागणी ही वेगळी असते

**अकोला:** दाबकी रोडच्या कर्ता हनुमान मंडळाच्या वतीने कर्ता हनुमान मंदिरात बुधवारी वारी भैरवगड येथील हभप ज्ञानेश्वर महाराज वाघ यांचे सुश्राव्य किर्तन संपन्न झाले.या कीर्तनात त्यांनी संत भगवंताना करीत असलेल्या मागणीवर चर्चा केली. ते म्हणाले,वारकरी संत हे मागणीच्या पद्धतीच्या विरोधात आहेत. संतांच्या गाथेत स्वतंत्रपणे मागणीवर चर्चा करण्यात आली आहे. संत हे मागणीच्या विरोधात असते तर गाथेत यावर ऊहापोह झालाच नसता. ते पुढे म्हणाले, तुकोबा म्हणतात, देवा आम्ही कोणालाही काही मागणार नाही, आणि मागण्यात झाले तर ते फक्त तुला मागू! यावरून संत हे भगवंतापाशी काहीतरी मागित असतात.

## निधन वार्ता

### नितीन कान्हे

**अकोला :** जुने शहर शिवाजी नगरातील साईबाबा



व्यायाम शाळा जवळील रहिवासी नितीन भैय्याजी कान्हे यांचे रविवारी सकाळी निधन झाले. सचिन कान्हे यांचे ते धाकटे बंधू होत. त्यांच्या पश्चात मोठा आप्तपरिवार आहे.

# देशमुख महिला मंडळाचा आरोग्यदायी उपक्रम ; फिटनेस चॅलेंज २०२६

प्रतिनिधी ५ एप्रिल



**अकोला:** देशमुख महिला मंडळाच्या वतीने महिलांच्या आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी भव्य वॉकिंग स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला मंडळातील सदस्य महिलांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या स्पर्धेत विविध वयोगटातील महिलांनी उत्साहाने सहभाग नोंदवला. स्पर्धेचे वैशिष्ट्य म्हणजे सहभागी महिलांना वयोगटानुसार तीन गटांमध्ये विभागण्यात आले होते, ज्यामुळे प्रत्येक गटात समसमान स्पर्धा पाहायला मिळाली.

या तीन गटांमध्ये स्वतंत्रपणे प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाचे विजेते निवडण्यात आले.

या मध्ये सुपर यंग प्रथम क्रमांक किरण देशमुख गोल्ड मेडल, द्वितीय क्रमांक नीता देशमुख , तृतीय क्रमांक सुनीता देशमुख रंजना,सध्या,सुलता,अरुणा शैलाजा यांना प्रशस्तीपत्र देण्यात आले तर ओपन ग्रुप मध्ये सोनाली अक्षय जगताप प्रथम क्रमांक गोल्ड मेडल, द्वितीय क्रमांक वसुधा संजय गोल्ड मेडल, तृतीय क्रमांक श्वेता प्रशांत देशमुख गोल्ड मेडल साधना धनंजय, तृप्ती संदीप गोल्ड मेडल, पूजा प्रभाकर सिल्वर मेडल, योगिनी मोहन, अंजली पंकज ब्रांझ मेडल, प्राची रेवती सोनल स्वाती उज्वला अस्मिता सुचिता प्रेरणा श्वेता प्रीती विद्या केतकी.. यंग ग्रुप मध्ये वर्षा मिलिंद गोल्ड मेडल प्रथम क्रमांक, मीना राजेश गोल्ड द्वितीय क्रमांक, सारिका मंगेश गोल्ड तृतीय क्रमांक, सिद्धी किरण वृषाली, मीना मुकुंद अर्चना मनीषा गोल्ड मेडल तर संगीता वर्षा प्रतिभा यांना सिल्वर मेडल, मंजुषा विवेक ब्रांझ मेडल शितल सीमा अलका संध्यामोहन सुनिता विद्या सुषमा संगीता अनिता अनुराधा जयश्री मनीषा श्रद्धा पूजा सीमा पौर्णिमा भारती राजश्री नयना अश्विनी कल्पना नभा निशा प्रतिमा स्नेहल यांना प्रशस्तीपत्र देण्यात आले.प्रत्येक गटातील विजेत्यांना वेगवेगळ्या प्रकारची आकर्षक बक्षिसे, सन्मानचिन्हे आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यामुळे सर्व वयोगटातील महिलांना प्रोत्साहन मिळाले आणि स्पर्धेचा उत्साह अधिकच वाढला.

शिस्तबद्ध पद्धतीने वॉक पूर्ण करत आपली शारीरिक क्षमता आणि जिद्द दाखवून दिली. आरोग्याबाबत सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होने असा या उपक्रमाचा उद्देश होता. हा उपक्रम परिसरात कौतुकास्पद ठरला असून भविष्यातही अशा आरोग्यविषयक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे मंडळाने सांगितले.

कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यामागे मंडळाच्या अध्यक्ष राजश्रीताई, सचिव स्वप्नालीताई, कोषाध्यक्ष प्रतिभाताई, उपाध्यक्ष नयनाताई ज्येष्ठ सल्लागार कविताताई व संपूर्ण कार्यकारिणी चे मार्गदर्शन आणि कोऑर्डिनेटरचे नियोजन, मेहनत आणि समर्पण हे विशेष कौतुकास्पद ठरले. संपूर्ण स्पर्धेचे उत्कृष्ट नियोजन, वेळेचे अचूक व्यवस्थापन आणि प्रत्येक सहभागीपर्यंत पोहोचण्याची त्यांची तळमळ स्पष्टपणे दिसून आली.

त्यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम अत्यंत शिस्तबद्ध आणि सुरळीत पार पडला. प्रत्येक छोट्या गोष्टीकडे बारकाईने लक्ष देत त्यांनी कार्यक्रमाला एक वेगळी उंची दिली. सहभागी महिलांना प्रोत्साहन देणे, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे आणि सकारात्मक वातावरण तयार करणे यात त्यांचा मोलाचा वाटा राहिला.

एखादा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी केवळ कल्पना नाही, तर योग्य नियोजन आणि निस्वार्थ मेहनत आवश्यक असते,ङ्ग याचे उत्तम उदाहरण म्हणजे या स्पर्धेचे कोऑर्डिनेटर होत. कोऑर्डिनेटर डॉक्टर अस्मिता देशमुख व त्यांची टीम श्वेता देशमुख आणि सिद्धी देशमुख त्यांच्या या कार्याबद्दल सर्व स्तरांतून त्यांचे मनःपूर्वक कौतुक करण्यात येत आहे.

# अवैध दारूविक्रीवर कारवाई; १ लाखांचा मुद्देमाल जप्त

वि. प्रतिनिधी ५ एप्रिल



**अकोट:** अकोट ग्रामीण पोलीस स्टेशनच्या हद्दीत 'ऑपरेशन प्रहार' अंतर्गत अवैध देशी व हातभट्टीच्या दारूविक्रीवर पोलिसांनी मोठी कारवाई करत एकूण १ लाख ४ हजार ७२० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईत पाच आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमाअंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पोलीस पथक पेट्रोलिंगदरम्यान गुप्त माहितीच्या आधारे विविध ठिकाणी छापे टाकण्यात आले. शहानुर येथे सुरू असलेल्या हातभट्टीवर कारवाई करून ७३ हजार ९२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच अकोलखेड (१०,२०० रु.), बोर्डी (१०,१०० रु.), मुंडगाव (५,२०० रु.) आणि करतवाडी (५,३०० रु.) येथे अवैध देशी दारूविक्री करणाऱ्या इसमांवर कारवाई करण्यात आली.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या आदेशान्वये, अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी व सहाय्यक पोलीस अधीक्षक निखील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. अकोट ग्रामीण पोलीस ठाण्याचे ठाणेदार किशोर जुनघरे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने ही कारवाई यशस्वीरीत्या केली. या पथकात उपनिरीक्षक वैभव तायडे, सहायक उपनिरीक्षक दादाराव लिखार, वासुदेव ठोसरे, पोलीस हवालदार उमेशचंद्र सोळंके, हरीष सोनवणे, शिवकुमार तोमर, सुधीर झटाले तसेच पोलीस कर्मचारी गोपाल जाधव, राहुल कांबळे, सुनिल पाटील, नितील तेलगोटे यांच्यासह होमगार्ड जवानांचा समावेश होता.

# 'वर्गमित्र परिवारा'तर्फे विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सन्मान

प्रतिनिधी ५ एप्रिल



**अडगांव बु .:**येथील सन १९९३-९४ च्या दहावीच्या 'वर्गमित्र परिवारा'तर्फे सामाजिक बांधिलकी जपत विविध क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या सत्कारमूर्तींचा आणि गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा उत्साहात पार पडला. स्थानिक जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या प्रांगणात हा हृदयस्पर्शी सोहळा झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वर्गमित्र परिवाराचे सदस्य तथा पोलीस पाटील हितेश हागे होते. सत्कारमुर्ती निलेश देऊळकार, सौ. साधनाताई काळपांडे,श्रीमती सुशीला ढोकणे, अमित राखोंडे,दिपाली खुमकर, कु.इश्वरी सोळंके, कु.रोहीनी डाबेराव, वर्गशिक्षिका मनिषा झाकर्डे,सुरेखा हागे यांची उपस्थिती होती. सर्वप्रथम क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. येथील श्रीमती सुशीला ढोकणे यांना उत्कृष्ट अंगणवाडी सेविका पुरस्कार, सौ.साधनाताई काळपांडे यांची वऱ्हाडी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड,पोलीस दलात अमित राखोंडे आणि दीपाली खुमकर निवड,निलेश देऊळकार फ्रेन्ड सर्कल अभ्यासिकेच्या यशस्वी कामगीरी बद्दल ,यांचा शाल व श्रीफळ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. तसेच विशेष प्राविण्य मिळवणाऱ्या ईश्वरी डिगांबर सोळंके,कु.रोहीनी रामा डाबेराव, विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. वर्गमित्र परिवारातर्फे विद्यार्थ्यांना प्रत्येकी ५०१ रुपयांचे रोख बक्षीस देऊन प्रोत्साहित करण्यात आले. कु.सारा नरेश वानखडेचा सुध्दा शिष्यवृत्ती करीता पात्र ठरल्या बद्दल गौरव करण्यात आला.तर वर्गमित्र परीवारांच्या वतीने फ्रेन्डसर्कल अभ्यासिकेला ९००० रुपये देणगी स्वरुपात सस्नेह भेट देण्यात आली.शेवटी अध्यक्षीय भाषणात पोलीस पाटील हितेश हागे यांनी मनोगत व्यक्त केले. या सोहळ्याला राजु बुटे, राजेश रंदे, नारायण पत्की,गोपाल लापुरकार, मनोज धाके, गजानन घोलप, ओमप्रकाश पांडव , रतनसिंग डाबेराव ,कु.ईश्वरी बुटे ,जि.प.प्रा. शाळेचे मुख्याध्यापक कोहळे मँडम, शिक्षक नितिन राजनकार, सोहन दामदर ,शैलैद्र भोपळे अमोल राखोंडे ,प्रमोद दाते मुक्ता भोयर, यांच्यासह शिक्षक,शिक्षीका, विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शेख जमीर यांनी केले. सूत्रसंचालन पत्रकार नाना देशमुख यांनी तर आभार प्रदर्शन प्रकाश आसरे यांनी केले.

# वडाळी देशमुखला श्री राम जय राम जय जय रामच्या जय जयघोषात जन्मोत्सव साजरा

प्रतिनिधी ५ एप्रिल

## ◆ प्रकट दिनाला ५१ किलो पेढे व फळांचे वाटप, भाविकांचा उत्स्फूर्त सहभाग

**अकोट:** तालुक्यातील वडाळी देशमुख येथे चैत्र शुद्ध पंचमी पौर्णिमेच्या मुहूर्तावर श्री हनुमंत राया जयंती व श्री संत चतुर्भुज महाराजांच्या जन्मोत्सव ला दिप महोत्सवाचे आयोजन मंदिरावर सजवलेली आकर्षण विद्युत रोषणाई हे सर्व भाविकांचे लक्ष वेधून घेत होती परिसरामधील स्वच्छता व फुल पुष्पगुच्छ यांनी सजवलेली महाराजांचे श्री चतुर्भुज महाराज समाधी मंदिर व रामेश्वर महादेव मंदिर पाहण्यास भाविकांना मनाला अगदी भाहून जाणारे असे होते आज श्री हनुमंत राया व श्री संत चतुर्भुजी महाराज या दोन्हीही ब्रह्मचारी महाराजांच्या एक दिवसीय शुभ दिवसाला श्री गणेश जय रामनाथ महादेव संस्थांमध्ये श्री चतुर्भुज महाराज समाधी मंदिर येथे प्रगट दिन जन्मोत्सवाचे भव्यदिव्य आकर्षण आयोजन करण्यात आले होते आज गुरुवार सकाळी ९ ते १ वाजेपर्यंत श्री चतुर्भुज महाराजांचे चरित्र पारायण मध्ये असंख्य महिला व पुरुष मंडळी मोठ्या भावभक्तीने प्रचंड उपस्थिती लागली होती यावेळी महाराजांची आरती व प्रसाद वाटप करून सर्व उपस्थित



महिला व पुरुष यांना महाप्रसादाचा लाभ घेतला, महाराजांच्या सजवलेल्या व्यासपीठावर चतुर्भुज महाराजांची प्रतिमा फोटो व सजवलेली मूर्त या ठिकाणी असंख्य फळांची सजवलेली सजावट हे विशेष लक्षणीय आकर्षण ठरली विशेषता महाराजांच्या विहिरीवर भाविकांनी नतमस्तक होऊन लहान चिमुकल्यासह दर्शन व तीर्थाचा लाभ घेतला याच व्यासपीठावर भाविक महिलांनी महाराजांचा मंत्र ङश्रीराम जय राम जय जय जय राम नामाच्या जयघोषितङ भाविक तल्लीन होऊन मंत्र सिद्ध झाले होते पंचक्रोशीतील महाराजांचे भाविक या कार्यक्रमाला मोठ्या संख्येत दाखल झाले होते व नंतर सायंकाळी ६ वाजता महाराजांच्या समाधी मंदिरामध्ये हजारो दीप लावून असंख्य महिलांचा जनसमुदाय दीप महाउत्सवाला लखलखत्या प्रकाश जोतात पायाला मिळाला प्रगट दिन प्रसाद म्हणून ५१ किलो पेढे व विविध फळा फळांचा प्रसाद भाविकांना वाटप करण्यात आले. प्रसादासाठी विशेषता महिलांच्या व पुरुषांच्या रांगा व त्यांची केलेली व्यवस्था हे विश्वस्ताकडून फार नियोजनबद्ध नियोजन केले होते श्री जय रामनाथ महादेव संस्थान मध्ये या पारंपरिक हनुमान जयंती व श्री संत चतुर्भुज महाराज जन्मोत्सव निमित्ताने दीप महाउत्सव सालाबादप्रमाणे यावर्षीही भाविकांसाठी प्रेरणादायी जनसंख्येत आनंद उत्सव ठरला.

# गोपी अण्णा चाकर यांना राष्ट्रसंत गाडगेबाबा 'कर्मयोगी समाजरत्न' पुरस्कार जाहीर

प्रतिनिधी ५ एप्रिल




**अकोला:** महाराष्ट्र राज्य तेलगू परीट समाजाचे प्रदेशाध्यक्ष तथा येथे आरोग्यसेवेत अत्यंत सेवाभावी काम करणारे सामाजिक कार्यकर्ते गोपी अण्णा चाकर यांना पुण्यातील ग्रामगौरव फौंऊडेशनच्या वतीने 'राष्ट्रसंत गाडगेबाबा कर्मयोगी समाजरत्न' पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त पुण्यात येत्या १ मे रोजी राज्याचे सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाठ यांच्या अध्यक्षतेखाली व राज्यसभा सदस्य ज्येष्ठ विधितज्ञ् पद्मश्री खा.अँड.उज्ज्वल निकम यांच्या शुभहस्ते अत्यंत दिमाखदार समारंभात हा सन्मान प्रदान केला जाणार आहे.गोपी अण्णा चाकर यांच्या कार्यकर्तृत्वाची यशोकथा असलेला 'आदर्श गगनभरारी' हा सामाजिक चरित्रग्रंथ सुद्धा यावेळी सुप्रसिद्ध अभिनेत्री अलका कुबल आठल्ये यांच्या हस्ते प्रकाशित होणार आहे.

अकोला येथे सामाजिक, आरोग्य व विविधांगी कार्य केल्याची दखल घेऊन तसेच महाराष्ट्र राज्यातील धोबी समाजाला पूर्ववत अनुसूचित जातींचे आरक्षण लागू व्हावे म्हणून दिल्ली येथे सर्वोच्च न्यायालयात दाखल याचिकेसाठी सामाजिक दायित्व भावनेने गोपी अण्णा चाकर यांनी केलेल्या योगदानाबद्दल त्यांचा सहकुटुंब हा सन्मान करण्यात येणार असल्याचे ग्रामगौरवचे अध्यक्ष विवेक ठाकरे व धोबी समाजाच्या सुप्रीम कोर्टातील आरक्षण प्रकरणी सह- याचिकाकर्ते असलेले सुभाष टाले,उमेश जानोरकर, प्रा.रमेश सांबस्कर व प्रा.कचरेश्वर राऊत या आयोजकांनी कळवले आहे.

# 'अवघा रंग एक झाला' सीताबाई कला महाविद्यालय परिसर भक्तीसंध्येने दुमदुमला



प्रतिनिधी ५ एप्रिल

**अकोला:** सध्याच्या काळात जगात कोलाहल आणि युद्धाची भीती पसरलेली असताना संतांची वाणी माणसाला अंतर्मुख दृष्टी देऊन त्याच्या चेतनेचा विस्तार करते. याच भावभूमीवर चैत्र महिन्याच्या आगमनानिमित्त अखिल भारतीय साहित्य परिषद पुरस्कृत 'साहित्य भारती' संस्थेतर्फे सीताबाई कला महाविद्यालय, अकोला येथे 'अवघा रंग एक झाला' या शीर्षकाखाली हिंदी–मराठी भक्ती संध्याचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजनाने करण्यात आली. त्यानंतर साहित्य भारतीच्या कार्याध्यक्षा सीमा बक्षी यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना मांडली. प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध कवी नारायण कुलकर्णी कवठेकर तसेच प्रा. डॉ. नाना भडके उपस्थित होते. त्यांचे स्वागत संस्थेचे अध्यक्ष डॉ. गजानन मालोकार यांनी केले.

या प्रसंगी मीराबाई, कबीर, तुलसीदास, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत सोयराबाई तसेच अमीर खुसरो यांच्या भक्तिपर रचनांचे सुमधुर गायन आशीष मालशे, ऋजुता रानडे आणि भक्ति बिडवई यांनी सादर केले. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन गिरीजा कानडे, अश्विनी गोरे आणि डॉ. पूनम मानकर पिसे यांनी केले.

'अवघा रंग एक झाला' या संकल्पनेनुसार विविध भाषा, जाती, धर्म आणि पंथ यांच्या प्रतिनिधिक रचनांच्या माध्यमातून विश्वशांतीचा संदेश देणे हा कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. उपस्थित श्रोत्यांमध्ये डॉ. गजानन नारे, कवी दिनेश शुक्ल, कृष्णकुमार शर्मा, डॉ. विनय दांडळे, ताराताई हातवळणे, राजू उखळकर , रमणी जोशी राष्ट्रसेविका समितीच्या आशाताई खोकले अशोक ढेरे, निनाद कुलकर्णी, डॉ. प्रवीण देशमुख आदींसह मोठ्या संख्येने साहित्यप्रेमींनी कार्यक्रमाचा आस्वाद घेतला व कौतुक केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बीजीई सोसायटीचे अध्यक्ष मोतिसिंह मोहता, अभिजित परांजपे, डॉ. आर. डी. सिकची तसेच साहित्य भारतीचे कार्यकारिणी सदस्य डॉ. डिंपल मापारी, परेश देशमुख, सतीश वाडेकर, नितीन बक्षी, रेणु बक्षी आदींसह सर्व सदस्यांचे योगदान लाभले.

# श्रीमंत योगी शिवरायांच्या स्मृतिदिनी मराठा महासंघातर्फे अभिवादन



प्रतिनिधी ५ एप्रिल

**अकोला:** ३ एप्रिल १६८० रोजी महाराष्ट्राचे आद्य दैवत, छत्रपती शिवाजी महाराज अनंतात विलीन झाले. रयतेच्या राजाने आजच्याच दिवशी या नश्वर जगाचा निरोप घेतला, पण त्यांची शिकवण, आणि त्यांनी घालून दिलेला आदर्श निरंतर शिवप्रेमींना प्रेरणा देत राहील. अशा या थोर हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांना आज त्यांच्या पुण्यतिथी निमित्त सहकार नगर मधील छत्रपती शिवरायांच्या पुतळ्यास हार अर्पण व नतमस्तक होऊन अखिल भारतीय मराठा महासंघ जिल्हा शाखेच्या वतीने अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी अखिल भारतीय मराठा महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष विनायकराव पवार जिल्हाध्यक्ष संजय सूर्यवंशी विभागीय उपाध्यक्ष योगेश थोरात महिला विभागीय अध्यक्ष माधुरीताई वाघमारे, वैशाली कदम, जिल्हा उपाध्यक्ष काशिनाथ पटेकर, युवा नेता श्याम देशमुख, मुरलीधर बकाल उपस्थित होते.



# सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ

रविवार, दि. ५ एप्रिल २०२६ https://epaper.citynewssuperfast.com


# जास्त व्याज देण्याचे आमिष

## भूअंकुर ॲग्रो कंपनीकडून ३ कोटी ८३ लाखांची फसवणूक

प्रतिनिधी ५ एप्रिल

**यवतमाळ** : यवतमाळ येथील भूअंकुर ॲग्रो प्रा. लि. कंपनीने ४९ गुंतवणूकदारांना महिना ४५ हजार रुपये परतावा देण्याचे आकर्षक आमिष दाखवून त्यांच्याकडून एकूण ३ कोटी ८३ लाख ५० हजार रुपयांची फसवणूक केली आहे. या फसवणुकीत गुंतवणूकदारांना सुरुवातीला नियमित परतावा मिळत होता, परंतु नंतर तांत्रिक अडचणींचा दावा करत कंपनीने परतावा देणे थांबवले. अनेक महिन्यांच्या पाठपुराव्यानंतर आणि किमान आश्वासने मिळूनही पैसे परत मिळवले नाहीत, त्यामुळे गुंतवणूकदारांनी अवधूतवाडी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

या प्रकरणात गुंतवणूकदारांनी भूअंकुर ॲग्रो प्रा. लि. कंपनीत मोठ्या प्रमाणावर पैसे गुंतवले होते. कंपनीने दर महिना ४५ हजार रुपये परतावा देण्याचे वचन दिले होते. सुरुवातीला काही महिन्यांपर्यंत गुंतवणूकदारांना नियमितपणे परतावा मिळत होता, त्यामुळे त्यांचा विश्वास कंपनीवर वाढला होता. मात्र, २०२५ नंतर अचानक तांत्रिक अडचणींचा कारण दाखवून कंपनीने परतावा देणे थांबवले. गुंतवणूकदारांनी अनेक वेळा कंपनीच्या कार्यालयात संपर्क साधला, परंतु त्यांना कुठलीही तंतोतंत माहिती किंवा पैशांची परतफेड मिळालेली नाही. दरम्यान, कंपनीच्या प्रतिनिधींनी गुंतवणूकदारांना आश्वासन दिले की, दिवाळीपर्यंत त्यांचे पैसे परत केले जातील, परंतु मुदत संपल्यानंतरही पैसे परत मिळाले नाहीत. अखेर गुंतवणूकदारांनी पोलिस ठाण्यात तक्रार केली. अवधूतवाडी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, आरोपींविरुद्ध कठोर कारवाई सुरू केली आहे.

तक्रारीनुसार कंपनीचे संचालक अरविंद चंद्रकांत चौधरी, रवींद्र सदाशिव कनाजे, दीपक सोने, संदीप घोसे, मेघा संदीप घोसे, पद्माकर गोलाईत आणि इतर सहा आरोपींविरुद्ध भारतीय दंड संहिता अंतर्गत फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आले आहे.

### १० लाख रुपयांपासून ते २४ लाख गुंतवणूक

■ गुंतवणूकदारांनी कंपनीमध्ये विविध रकमांमध्ये पैसे गुंतवले होते, ज्याची रक्कम १० लाख रुपयांपासून ते २४ लाख रुपयांपर्यंत होती. गुंतवणूकदारांमध्ये नीलेश रापर्तीवार, गजेंद्र गणवीर, विनोद शर्मा, सरला इंगळे, विलास मुंडे, सीमा मुंडे, वीरेंद्रसिंह चव्हाण, ओमप्रकाश खांडेकर, सदानंद गणवीर, वीणा भगत, धीरज वाणी, अमोल खडसे, रुपाली धुमारे, डॉ. संजय मुत्तुपोडरेड्डी, राहुल कोचे, ज्योती सानप, राजेश नथवाणी, विजय जाधव, उमाशंकर वैश्य, बिपीन टाके, प्रियंका बोरुंडिया, विनोद थरकडे, सचिन डवरे, अमोल मोरे, अरविंद धावडे, निरंजनसिंग, वासुदेव मोने, दिशा कोल्हे, मारोती आत्राम, छाया जळेकर, पंकज जळेकर, प्रकाश कुडमथे, अमोल शिंदे, नितीन धागडे, पंकज कोल्हारकर आणि रोशन जयस्वाल यांचा समावेश आहे.

## माहूरगडावर परंपरेची अखंड ज्योत; डॉ. धनेश्वर भारती ३१वे महंत

प्रतिनिधी ५ एप्रिल

**महागाव** : श्री दत्त शिखर संस्थान, माहूरगड येथे परंपरेनुसार पार पडलेल्या पवित्र 'ईश्वर चिठ्ठी' प्रक्रियेद्वारे परमपूज्य डॉ. धनेश्वर भारती (श्याम महाराज) यांची ३१वे महंत म्हणून निवड करण्यात आली आहे. विशेष म्हणजे सलग तीन वेळा काढण्यात आलेल्या चिठ्ठीत त्यांचेच नाव आल्याने या निवडीला दैवी संकेत मानले जात असून, भक्तांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

दरम्यान, संस्थानचे विद्यमान महंत परमपूज्य मधुसूदन भारती (मालक) यांनी ४ एप्रिल रोजी सायंकाळी पाच वाजता देह ठेवला. त्यांच्या निधनाने दत्तसंप्रदायात शोककळा पसरली असून, माहूरगडने एक महान संत गमावला आहे. महंत मधुसूदन भारती यांनी आयुष्यभर दत्तभक्ती, सेवा आणि कठोर साधनेत स्वतःला वाहून घेतले. साधेपणा, संयम आणि अध्यात्मिक तेज यांचा संगम त्यांच्या व्यक्तिमत्त्वात होता. त्यांच्या ओजस्वी वाणीमधून असंख्य भक्तांना धर्ममार्गाची दिशा मिळाली. त्यांच्या जीवनातील एक वैशिष्ट्य म्हणजे ते दर बारा वर्षांनी माहूरगडावरून खाली उतरून भक्तांना दर्शन देत असत. नांदेड व महागाव येथेही अनेक भक्तांना त्यांच्या दर्शनाचा लाभ झाला होता. अशा शोकमय वातावरणातच डॉ. धनेश्वर भारती यांची महंतपदी झालेली निवड ही भक्तांसाठी दिलासा देणारी ठरली आहे.

# 'लाडकी बहिण' योजनेला ईकेवायसीचा खोडा

## लाखो महिला वंचित राहण्याची शक्यता; स्वतंत्र मुदतवाढीची मागणी

प्रतिनिधी ५ एप्रिल




**यवतमाळ** : राज्य शासनाच्या 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण' या महत्त्वाकांक्षी योजनेच्या अंमलबजावणीत eKYC प्रक्रियेतील अडचणी मोठा अडसर ठरत असून, लाखो महिला लाभापासून वंचित राहण्याची भीती व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर eKYC प्रक्रिया पूर्ण न केलेल्या महिलांसाठी स्वतंत्र मुदतवाढ जाहीर करावी, अशी मागणी देवानंद पवार यांनी मुख्यमंत्री Devendra Fadnavis यांच्याकडे केली आहे.

उपलब्ध आकडेवारीनुसार, राज्यातील सुमारे २.५ कोटी महिलांना या योजनेचा लाभ दिला जात असला, तरी अंदाजे ३५ लाख महिला अद्याप विविध कारणांमुळे वंचित आहेत. यापैकी जवळपास २० लाख महिलांनी eKYC प्रक्रिया पूर्ण केलेली नसल्यामुळे त्यांचा योजनेत समावेश होऊ शकलेला नाही. त्यामुळे ही बाब अत्यंत चिंताजनक ठरत आहे.

यवतमाळ जिल्ह्यातही याचे पडसाद उमटले आहेत. सुमारे ५.५ ते ६ लाख लाभार्थ्यांपैकी १ ते १.२ लाख महिला सध्या योजनेपासून दूर आहेत. त्यापैकी सुमारे ७० हजार महिलांनी अद्याप eKYC प्रक्रिया पूर्ण केलेली नाही. ग्रामीण व आदिवासी भागातील महिलांना तांत्रिक माहितीचा अभाव, इंटरनेट सुविधेची कमतरता, तसेच आवश्यक मार्गदर्शन न मिळाल्यामुळे ही प्रक्रिया वेळेत पूर्ण करता आलेली नाही.

शासनाने यापूर्वी ३१ मार्च २०२६ पर्यंत दिलेली मुदतवाढ तसेच सध्या ३० एप्रिल २०२६ पर्यंत वाढवलेली मुदत ही केवळ eKYC त्रुटी दुरुस्तीसाठी मर्यादित असल्याचे निदर्शनास आले आहे. मात्र, ज्या महिलांनी eKYC प्रक्रियाच केलेली नाही, त्यांच्यासाठी कोणतीही स्पष्ट तरतूद नसल्याने मोठ्या प्रमाणात संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या पार्श्वभूमीवर महिला व बालकल्याण विभागाच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. प्रशासनातील समन्वयाचा अभाव आणि नियोजनातील त्रुटींमुळे ही परिस्थिती उद्भवल्याचा आरोप होत आहे.

दरम्यान, देवानंद पवार यांनी काही ठोस मागण्या केल्या आहेत. यामध्ये eKYC न केलेल्या महिलांसाठी तातडीने स्वतंत्र मुदतवाढ जाहीर करणे, ग्रामस्तरावर विशेष शिबिरे व हेल्पडेस्क सुरू करणे, तांत्रिक सहाय्य केंद्रांची उभारणी करणे, तसेच वंचित महिलांना पुन्हा योजनेत समाविष्ट करण्यासाठी राज्यव्यापी विशेष मोहीम राबविणे यांचा समावेश आहे.

महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या या योजनेचा लाभ प्रत्येक पात्र महिलेला मिळणे गरजेचे असून, यासाठी शासनाने तातडीने हस्तक्षेप करून सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# प्रदेश युवक काँग्रेसचे सचिव शेख तालीब अहमद यांचा राजीनामा

## स्थानिक नेतृत्वावर तीव्र नाराजी; मुस्लिम कार्यकर्त्यांना डावलल्याचा आरोप

प्रतिनिधी ५ एप्रिल




**उमरखेड** : प्रदेश युवक काँग्रेसचे सचिव शेख तालीब अहमद यांनी पक्षपदाचा राजीनामा देत स्थानिक नेतृत्वावर तीव्र नाराजी व्यक्त केली. उमरखेड येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी हा निर्णय जाहीर केला.

प्रदेश कार्यकारिणीसाठी पाठविण्यात आलेल्या शिफारशींमध्ये विधानसभा व लोकसभा निवडणुकांदरम्यान पक्षविरोधी काम करणाऱ्या चौघांच्या नावांचा समावेश करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला. मात्र, सातत्याने पक्षासाठी कार्य करणाऱ्या एकाही मुस्लिम कार्यकर्त्याचे नाव त्यात नसल्याने त्यांनी नाराजी व्यक्त केली. आपला राजीनामा प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे आणि प्रदेश सरचिटणीस साहेबराव कांबळे यांच्याकडे पाठविल्याचे त्यांनी सांगितले. स्थानिक नेतृत्वाने निष्ठावान कार्यकर्त्यांवर अन्याय केल्याचा आरोप करत, "पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी प्रामाणिकपणे काम करत असताना मुस्लिम समाजातील कार्यकर्त्यांना डावलले जात आहे," असे ते म्हणाले.

पक्षपद किंवा निवडणूक लढविण्याची कोणतीही वैयक्तिक महत्त्वाकांक्षा नसून, समाजासाठी काम करत राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. स्थानिक काँग्रेस नेत्यांचे जिल्ह्यातील प्रभावही कमी झाल्याची टीकाही त्यांनी केली.

# मराठी माध्यमाच्या शाळांना अस्तित्वाचा प्रश्न; विद्यार्थ्यांची घट चिंताजनक

प्रतिनिधी ५ एप्रिल



**झरी जामणी** : तालुक्यातील मराठी माध्यमाच्या शाळांसमोर अस्तित्वाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून, विद्यार्थ्यांच्या सतत घटणाऱ्या संख्येमुळे शिक्षणव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. पालकांचा वाढता कल इंग्रजी माध्यमाकडे वळत असल्याने अनेक शाळा ओस पडण्याच्या मार्गावर आहेत. ग्रामीण भागात शासकीय सोयी-सुविधा उपलब्ध असूनही मराठी शाळांकडे पाठ फिरवली जात आहे.

सरकारकडून मोफत पाठ्यपुस्तके, गणवेश, पोषण आहार यांसारख्या सुविधा दिल्या जात असल्या, तरी इंग्रजी माध्यमाबद्दलचे आकर्षण अधिक प्रभावी ठरत आहे. परिणामी, मराठी शाळांतील पटसंख्या झपाट्याने कमी होत आहे. याचा थेट परिणाम शिक्षकांवरही दिसून येत असून, कमी होत चाललेल्या विद्यार्थ्यांमुळे शिक्षकांवर अतिरिक्त जबाबदाऱ्या येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. काही ठिकाणी शाळा एकत्रीकरणाची वेळ येण्याचीही भीती व्यक्त होत आहे.

दरम्यान, मराठी माध्यमातून शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांची पायाभूत समज आणि स्थानिक वास्तवाशी असलेले नाते अधिक भक्कम असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. मात्र, बदलत्या काळानुसार इंग्रजीचे महत्त्व नाकारता येत नसल्याने पालक द्विधा मनःस्थितीत आहेत.

शासनाने मराठी माध्यमाच्या शाळांचे बळकटीकरण, आधुनिक सुविधा आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण यावर भर दिल्यासच ही घसरण थांबू शकते, अन्यथा ग्रामीण भागातील मराठी शाळांचे अस्तित्व धोक्यात येण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

## बिबट्याच्या हल्ल्यात गाय ठार

प्रतिनिधी ५ एप्रिल

**उमरखेड** : तालुक्यातील पोफाळी मंडळातील गंगणमाळ शेतशिवारात बिबट्याने गायीवर हल्ला करून ठार केल्याची घटना उघडकीस आली. त्यामुळे शेतकऱ्यांसह ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. ज्ञानबा उत्तमराव बुरकुले या शेतकऱ्याची गाय मंगळवारी चरण्यासाठी गेल्यानंतर घरी परत आली नाही. यामुळे शेतकऱ्याने दुसऱ्या दिवशी सकाळी शोधमोहीम सुरू केली. ही गाय भगवान सूर्यभान बुरकुले यांच्या शेतात मृतावस्थेत आढळली. गायीच्या मानेवर गंभीर जखमा व शरीराचा काही भाग खाल्लेला दिसून आला. घटनेची माहिती मिळताच वन अधिकारी व कर्मचारी पशुवैद्यकीय पथकासह घटनास्थळी दाखल झाले. यावेळी बिबट्याच्या पायाचे ठसे आढळले. या घटनेमुळे शेतकऱ्याचे ६५ हजारांचे नुकसान झाले आहे.

# डाखोरे बहीण-भावाची एकाच वेळी पोलीस दलात भरारी

प्रतिनिधी ५ एप्रिल



**महागाव** : तालुक्यातील धारेगाव येथील सख्खे बहीण-भाऊ कु. त्रिवेणी विश्वनाथ डाखोरे आणि देविदास विश्वनाथ डाखोरे यांनी एकाच वेळी महाराष्ट्र पोलीस दलात निवड मिळवत गावासह संपूर्ण परिसराचा मान उंचावला आहे. एकाच कुटुंबातील दोघांची एकाच वेळी पोलीस दलात निवड होणे ही दुर्मिळ व प्रेरणादायी घटना ठरली आहे.

साध्या कुटुंबातून आलेल्या या दोघांनी लहानपणापासून मोठी स्वप्ने पाहिली. आर्थिक अडचणी आणि ग्रामीण भागातील मर्यादा यांवर मात करत त्यांनी शिक्षण पूर्ण केले. विशेष म्हणजे शालेय व उच्च शिक्षणापासून ते पोलीस भरतीच्या तयारीपर्यंतचा त्यांचा प्रवास एकत्रच राहिला.

एकमेकांना प्रेरणा देत त्यांनी कठोर परिश्रम केले आणि त्याचेच फळ म्हणून दोघांचीही एकाच वेळी निवड झाली.

याहून विशेष म्हणजे दोघांचीही नियुक्ती त्यांच्या गृह जिल्हा यवतमाळ येथेच झाली आहे. आपल्या मातीत सेवा करण्याची संधी मिळाल्याने कुटुंबीय आणि गावकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

या यशानिमित्त आदिवासी कृती समितीच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या जिद्दीचे कौतुक करत, "डाखोरे बहीण-भाऊ यांनी संपूर्ण समाजासाठी प्रेरणादायी उदाहरण निर्माण केले आहे," असे मत व्यक्त केले.

सत्कार सोहळ्यास गावातील मान्यवर, नातेवाईक, मित्रपरिवार व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी त्यांच्या पुढील सेवेसाठी शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी अनेकांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले.

धारेगावसारख्या ग्रामीण भागातून दोन अपत्यांनी एकाच वेळी पोलीस दलात प्रवेश करून देशसेवेची वाट निवडली, ही केवळ यशोगाथा नसून संघर्ष, जिद्द आणि कुटुंबाच्या पाठबळाची प्रेरणादायी कहाणी ठरली आहे.



■ यवतमाळ : ग्रामीण भागात सध्या घरगुती एलपीजी गॅसचा तुटवडा तीव्र झाला असून याचा सर्वाधिक फटका गृहिणींना बसत आहे. गॅस सिलेंडर वेळेवर उपलब्ध होत नसल्याने दैनंदिन स्वयंपाकाचे नियोजन विस्कळीत झाले आहे. अनेक गावांमध्ये ऑनलाईन बुकिंग करूनही 10 ते 15 दिवस प्रतीक्षा करावी लागत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून केल्या जात आहेत. गॅस वितरण करणारी वाहने उशिरा येत असल्याने ग्राहकांना वारंवार एजन्सीकडे चौकशी करावी लागत आहे. गॅसअभावी अनेक महिलांना पुन्हा चुलीवर स्वयंपाक करण्याची वेळ आली आहे.

# भीम चषक 2026 चा बिगुल; दुसऱ्या पर्वासाठी यवतमाळ सज्ज!

प्रतिनिधी ५ एप्रिल



**यवतमाळ** : शहरातील सर्वात लोकप्रिय रात्रकालीन टेनिस क्रिकेट स्पर्धा असलेल्या भीम चषक 2026 च्या दुसऱ्या पर्वाचा बिगुल वाजला असून संपूर्ण जिल्ह्यात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. नुकतीच या स्पर्धेची लिलाव प्रक्रिया शहरातील मीडटाउन हॉटेल येथे मोठ्या उत्साहात पार पडली. यामध्ये तब्बल 20 संघ आणि सुमारे 370 खेळाडूंनी नोंदणी करत स्पर्धेची रंगत वाढवली आहे.

या स्पर्धेत ब्लीड धोनिजम, छत्रपती वॉरियर्स, आर्यन वाय.पी.एल., व्ही.एस. कंपनी, स्वराज्य 11, स्पार्टन्स 11, सुभाष 11, आर.आर.आर. पँथर, ओम तिवारी वाय.पी.एल., लीजेंट्स इलेव्हन, कोहिनूर बादशहा, के-टेन स्पोर्ट्स, फ्रेंड्स फॉरेवर, सिटी सुपर किंग, छत्रपती मराठा, मा. भवानी चौधरी इलेव्हन, सी.फोर एस.आर. स्ट्रायकर्स, बी.के. अँड पार्थ हंटर आणि भगवा योद्धा या संघांचा सहभाग निश्चित झाला आहे.

शहरातील सर्वोत्तम खेळाडू, त्यांची उत्कृष्ट खेळकला, स्पर्धेचे सुंदर नियोजन आणि रोमहर्षक सामने यामुळे प्रेक्षकांच्या अपेक्षा प्रचंड वाढल्या आहेत. पहिल्या पर्वाला मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादानंतर आता दुसऱ्या पर्वाची उत्सुकता शिगेला पोहोचली असून यंदा स्पर्धा अधिक रंगतदार होणार असल्याचे चित्र आहे.

ही स्पर्धा 20 एप्रिल ते 27 एप्रिल दरम्यान यवतमाळमधील समता मैदानावर दिवस-रात्र खेळवण्यात येणार आहे. विशेष म्हणजे, डब्ल्यू डी झेड या यूट्यूब लाईव्ह चॅनेलवरून संपूर्ण स्पर्धेचे थेट प्रक्षेपण करण्यात येणार असून जगभरातील प्रेक्षकांना आपल्या मोबाईलवरून सामने पाहण्याची संधी मिळणार आहे.

बक्षीस रक्कमही आकर्षक ठेवण्यात आली आहे. प्रथम पारितोषिक म्हणून दोन लाख रुपये आणि विजेत्या संघमालकाला एक्टिवा वाहन देण्यात येणार आहे. द्वितीय पारितोषिक एक लाख रुपये तर तृतीय पारितोषिक पन्नास हजार रुपये ठेवण्यात आले आहे. याशिवाय उत्कृष्ट फलंदाज, उत्कृष्ट गोलंदाज, मालिकावीर, सामनावीर आणि उत्कृष्ट क्षेत्ररक्षक असे वैयक्तिक पुरस्कारही देण्यात येणार आहेत.

यवतमाळ, कळंब, आर्णी, राळेगाव, दारव्हा, बाभुळगाव आणि अकोलाबाजार या तालुक्यांमधील खेळाडूंनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला आहे. जिल्ह्यातील खेळाडूंना त्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी आणि एक भक्कम व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असल्याचे आयोजन समितीचे अध्यक्ष विपुल खोब्रागडे व सोनु मेश्राम यांनी सांगितले. या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी अर्जुन समितीमध्ये विपुल खोब्रागडे, सुरज मेश्राम, शत्रुघ्न राऊत,डॉ. स्वप्निल मानकर, पिंटु घोटीकर, अक्षय बानोरे, राकेश पाटील, रोहित चव्हाण, कुंदन मेश्राम, तातु मुराब, प्रसाल बाजपेयी, मयूर खुणकर, शुभम खुणकर, अजय मिश्रा, तुषार नवघरे, नारनवरे, प्रतिक मेंढे, राजू चौधरी, आतिश वनकर आदी सदस्यांचा समावेश असून ते स्पर्धा यशस्वी करण्यासाठी प्रयत्नशील आहेत.

एकूणच, यंदाचा भीम चषक अधिक भव्य, रंगतदार आणि थरारक होणार असून क्रिकेटप्रेमींसाठी ही पर्वणी ठरणार आहे.

सिटी न्यूज अमरावती

रविवार, दि. ५ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# हवामान अनुकूल शेतीसाठी जिल्ह्यात 'डिजिटल शेतीशाळा'

**अमरावती:** मागील काही वर्षांत हवामानातील बदलामुळे निर्माण झालेली पावसाची अनिश्चितता, पावसातील खंड, मान्सूनचे उशिरा आगमन आणि गारपीट यांसारख्या आव्हानांचा सामना करण्यासाठी शेतीला आता आधुनिक तंत्रज्ञानाची जोड दिली जाणार आहे. राज्य शासनाने जागतिक बँकेच्या सहाय्याने सुरू केलेल्या 'नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प २.०' अंतर्गत, अमरावती जिल्ह्यासह राज्यातील २१ जिल्ह्यांमध्ये 'हवामान अनुकूल तंत्रज्ञान अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियानाचा एक महत्त्वाचा टप्पा म्हणून पाणी फाउंडेशनच्या सहकार्याने येत्या एप्रिल २०२६ मध्ये विशेष 'डिजिटल शेतीशाळा' आयोजित करण्यात आल्या आहेत. पाणी फाउंडेशनद्वारे संचालित ही डिजिटल शेतीशाळा झूम आणि यूट्यूब यांसारख्या ऑनलाईन माध्यमांतून चालविली जाणार आहे, जिथे तज्ज्ञांमार्फत शेतकऱ्यांना पीकनिहाय शास्त्रोक्त मार्गदर्शन मिळेल.

# शिवाजी महाराजांच्या स्वराज्यात अंधश्रध्देला थारा नव्हता- डॉ. श्रीकांत पाटील

प्रतिनिधी ५ एप्रिल

## विद्यापीठातील आजीवन अध्ययन विभागात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन

**अमरावती:** छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यकारभारात पारदर्शकता, न्यायप्रियता आणि सुयोग्य प्रशासन यावर विशेष प्रकाश टाकतांना आजच्या काळात प्रभावी नेतृत्व आणि सुशासन यासाठी शिवाजी महाराजांचे तत्त्वज्ञान अत्यंत मार्गदर्शक ठरते. विद्यार्थी तसेच तरुण पिढीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा सखोल अभ्यास करून प्रत्यक्ष जीवनात उतरवणे ही काळाची गरज आहे. सोबतच सध्या महाराष्ट्रात सुरू असलेल्या भोंदूगिरी सारखा प्रकाराला छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यात थारा नव्हता असे, प्रतिपादन डॉ. श्रीकांत पाटील यांनी केले.



आजीवन अध्ययन व विस्तार विभागामार्फत स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त एक अत्यंत भावपूर्ण, प्रेरणादायी आणि शैक्षणिक दृष्ट्या महत्त्वपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यापीठ परिसरात आयोजित या कार्यक्रमात इतिहास, व्यवस्थापन आणि राष्ट्रनिष्ठा यांचा संगम अनुभवायला मिळाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, एम.ए. छत्रपती शिवाजी महाराज विचारधारा आणि व्यवस्थापन अभ्यासक्रमाचे समन्वयक डॉ. भैय्यासाहेब चिखले, प्रमुख वक्ते डॉ. वैभव म्हस्के, पंचवटे सर, सुरेश रहाटे उपस्थित होते.

प्रमुख वक्ते डॉ. वैभव म्हस्के यांनी आपल्या सखोल आणि अभ्यासपूर्ण भाषणातून शिवाजी महाराजांच्या व्यक्तिमत्त्वाचा विविध अंगांनी परामर्श घेतला. त्यांनी महाराजांची युध्दनीती, प्रशासन, गनिमी कावा, सागरी सामर्थ्य, लोककल्याणकारी राज्यकारभार याचा उल्लेख करत त्यांच्या कार्याचे आधुनिक काळातील व्यवस्थापनशास्त्राशी असलेले संबंध स्पष्ट केले. शिवाजी महाराज हे केवळ एक पराक्रमी योध्दे नव्हते, तर ते एक उत्कृष्ट व्यवस्थापक, दूरदर्शी नेतृत्व आणि लोकाभिमुख राजा होते, असे ते म्हणाले. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी सुध्दा शिवाजी महाराजांवर विचार मांडले, तर काहींनी घोषवाक्यांद्वारे वातावरण अधिक प्रेरणादायी केले. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. डॉ. भैय्यासाहेब चिखले यांनी प्रास्ताविकेतून शिवाजी महाराजांच्या विचारधारेचा शैक्षणिक अभ्यासक्रमाशी असलेला निकट संबंध अधोरेखित केला. सूत्रसंचालन प्रा. भूषण घोंगडे, आभार अमित शिंदे यांनी मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# तडीपार आरोपी अटकेत




**अमरावती** : आज ०३/०४/२६ रोजी पो स्टे फ्रेजरपुरा हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना पोलीस स्टेशन भातकुली हद्दीतील तडीपार इसम नामें महेंद्र उर्फ तुफान भगवान चेंडकापुरे वय ३२ रा भातकुली अमरावती हा हातात चाकू घेऊन संजय गांधी नगर येथे सार्वजनिक ठिकाणी दहशत करीत असताना मिळून आला. त्याला त्याब्यात घेऊन त्याच्याकडून १ चाकू किंमत अंदाजे १००० /रु जप्त करून पो स्टे फ्रेजरपुरा येथे कलम ४/२५ शस्त्र अधिनियम सह कलम १४२,१३५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात येत आहे .


# भानखेडा महिला अत्याचार प्रकरणातील आरोपींना अटक

प्रतिनिधी ५ एप्रिल

## पोलीस उपायुक्त गणेश शिंदे यांनी पत्र परिषदेमध्ये दिली माहिती

**अमरावती** : बहुचर्चित भानखेडा मार्गावरील महिला अत्याचार प्रकरणातील पाच आरोपींना पोलिसांनी अटक केली त्याची माहिती पत्र परिषदेमध्ये पोलीस उपायुक्त गणेश शिंदे यांनी दिली.

यावेळी एसीपी कैलास फुंडकर,वरिष्ठ पोलीस निरीक्षक रोशन शिरसाट यांची उपस्थिती होती. मुख्य आरोपी इश्वर पांडुरंग मरसकोल्हे वय ३४ वर्ष रा भानखेडा अम हा असून इतर आरोपींमध्ये दिवाकर श्रीकृष्ण मरसकोल्हे वय २५ वर्ष रा भानखेडा अम.,प्रमोद नारायण वाघाडे वय ३१ वर्ष रा



भानखेडा अम.,शुभम / सोमेश्वर नारायण वाघाडे वय २८ वर्ष रा भानखेडा अम., उमेश बेनीराम भोयर वय ४७ वर्ष रा भानखेडा अम. यांचा समावेश आहे . अटक आरोपी विरुध्द आज पावेतो भरपुर पुरावा गोळा करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा तपास सुरु आहे. फ्रेझरपुरात ठाण्यात आरोपी विरुद्ध १८९/२०२६ कलम ७०(१), ७७, १२७(२), ३५१(२), ३१०(२) गुन्हे दाखल करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली.

हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घ ता वेळी व ठिकाणी फिर्यादी व तिचा मित्र उभे असताना नमुद अज्ञात आरोपी येवून त्यांना मारहाण करून धमकी दिली फिर्यादी व साक्षदार आरडा ओरड करीत असताना नमुद आरोपीतापैकी एकाने साक्षदारास काठी मारली व रोड चे खाली जंगला मध्ये नेवून त्यांना मारहाण केले त्यांचे जवळून दोन मोबाइल घेतले तसेच फिर्यादी कडून १२० रू जबरीने घेतले नमुद आरोपी पैकी एकाने फिर्यादीस आणखी बाजुला नेवून तिचे सोबत अतिप्रसंग केला व साक्षदार यास इतर आरोपीतानी दोरीने बांधुन ठेवले नंतर तुमचा व्हीडीओ काढला असून तो व्हायरल करण्याची धमकी दिली अशा फिर्यादीचे बयाना वरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# प्रा. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंटचा दीक्षांत समारंभ उत्साहात

प्रतिनिधी ५ एप्रिल

**अमरावती** : विदर्भ यूथ वेलफेयर संस्थेच्या अंतर्गत प्रा. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट, बडनेरा येथे बॅच २०२५ चा दीक्षांत समारंभ अत्यंत उत्साहपूर्ण व दिमाखदार वातावरणात पार पडला. या सोहळ्यात एकूण ३७१ पदवीधर, १० पदव्युत्तर विद्यार्थी तसेच ०६ पीएच.डी. धारकांना पदव्या प्रदान करण्यात आल्या. याप्रसंगी उत्कृष्ट शैक्षणिक यश संपादन करणाऱ्या १२ गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करून त्यांना गौरविण्यात आले.

या सोहळ्याला विदर्भ यूथ वेलफेयर संस्थेचे कोषाध्यक्ष प्रा. डॉ. हेमंत देशमुख, प्र-कुलगुरू संत




गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे डॉ. महेंद्र ढोरे, कार्यकारी सदस्य श्री. पंकज देशमुख, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय ठाकरे तसेच दीक्षांत समारंभाचे समन्वयक डॉ. स्वप्नील मोहोड उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय ठाकरे यांनी विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल अभिनंदन केले व येणाऱ्या काळात तंत्रज्ञानाची कास धरावी, असे आवाहन केले.

संस्थेचे कार्यकारी सदस्य श्री. पंकज देशमुख यांनी शुभेच्छा देत स्वयंरोजगाराची कास धारावी असे आव्हान केले व महाविद्यालयाचे अभिनंदन केले. समारंभाच्या अध्यक्षस्थानी विदर्भ यूथ वेलफेयर संस्थेचे कोषाध्यक्ष प्रा. डॉ. हेमंत देशमुख हे होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी विद्यार्थ्यांना जीवनात यशस्वी होण्यासाठी सातत्य, प्रामाणिकपणा आणि कठोर परिश्रम यांचे महत्त्व पटवून दिले. तसेच, विद्यार्थ्यांनी बदलत्या तंत्रज्ञानाशी सुसंगत राहून समाजाभिमुख दृष्टीकोन ठेवावा, असेही त्यांनी आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे उपस्थित होते. त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर स्पर्धा करण्यासाठी आवश्यक कौशल्ये, नवनवीन तंत्रज्ञानाचे ज्ञान आणि सकारात्मक दृष्टीकोन यांचे महत्त्व अधोरेखित केले.

# अचलपुरात खळबळ : आमदार प्रवीण तायडे यांच्या नातेवाईकाला मारण्याचा कट?

प्रतिनिधी ५ एप्रिल

## बच्चू कडू यांच्यावर आरोप; कथित ऑडिओमुळे राजकारण तापले

**अमरावती** : माजी आमदार बच्चू कडू यांची ऑडिओ क्लिप व्हायरल झाली आहे. या क्लिपमध्ये त्यांचे कारनामे जाहिरात झाले असून आम्ही जिल्हा पोलीस अधीक्षकांना भेटून तातडीने कायदेशीर कारवाई करण्यात यावी यासंदर्भात मागणी करणार आहे. आणखीनही यासंदर्भाचे पुरावे आम्ही त्यांना देऊन त्यांच्याशी चर्चा करणार असल्याचे आमदार प्रवीण तायडे यांनी पत्र परिषदेमध्ये सांगितले.

यामुळे माजी आमदार बच्चू कडू यांच्या अडचणीत वाढ झाली आहे.

पत्र परिषदेला राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार प्रवीण तायडे, आमदार राजेश वानखडे, भाजपचे प्रवक्ते शिवराय कुलकर्णी, भाजपाचे शहर जिल्हा अध्यक्ष नितीन धांडे, भाजपाचे ग्रामीणचे अध्यक्ष रविराज देशमुख, भाजपचे नेते तुषार भारतीय, प्रदेश कार्यकारिणी सदस्य अतुल गोळे, भाजपा उपाध्यक्ष मुरली माकोडे, चांदूरबाजार तालुकाध्यक्ष हर्षद धुळे यांचीही प्रामुख्याने पत्र परिषदेला उपस्थिती होती. याप्रकरणी आमदार प्रवीण तायडे यांनी बच्चू कडूंच्या विरोधात पत्र परिषदेमध्ये सविस्तर माहिती दिली.



अचलपूर विधानसभा क्षेत्रात एक अत्यंत धक्कादायक आणि खळबळजनक प्रकरण समोर आले असून, एका कथित ऑडिओ क्लिपमुळे राजकीय वर्तुळात मोठी चर्चा सुरू झाली आहे. या ऑडिओमध्ये आमदार प्रवीण तायडे यांच्या चुलत भावाला मारण्याचा कट रचल्याचे संकेत असल्याचा दावा केला जात आहे. या प्रकरणात बच्चू कडू यांचे नाव पुढे येत असल्याने राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. प्राप्त माहितीनुसार, समोर आलेल्या कथित ध्वनिमुद्रणात काही व्यक्तींमधील संभाषणात 'अपघाताच्या स्वरूपात घटना घडवून आणणे', 'गेम लावणे', '१५ दिवसांत काम पूर्ण करणे' तसेच 'दुसऱ्याच्या माध्यमातून कारवाई करणे' अशा उल्लेखांचा समावेश आहे. त्यामुळे हा संवाद एखाद्या नियोजित कटाचा भाग असू शकतो, असा संशय व्यक्त केला जात आहे.

याशिवाय, या संभाषणात राजकीय पक्षात प्रवेश करून विश्वास संपादन करणे आणि त्यानंतर लक्ष्यावर कारवाई करणे, अशा प्रकारचे संकेत असल्याचीही चर्चा आहे. काही ठिकाणी विशिष्ट राजकीय पक्षाचा उल्लेख असल्याचे सांगितले जात असून, यामुळे प्रकरण अधिकच गंभीर झाले आहे.

कथित ऑडिओमध्ये आर्थिक व्यवहारांचेही संकेत असल्याचे समोर येत आहे. 'काम पूर्ण करण्यासाठी रक्कम देणे तसेच' घटना घडल्यानंतर प्रकरण दाबून टाकणे अशा बाबींचाही उल्लेख असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे या प्रकरणामागे मोठे कटकारस्थान असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.दरम्यान, या ऑडिओ क्लिपची सत्यता अद्याप अधिकृतरीत्या सिद्ध झालेली नाही. त्यामुळे याची तांत्रिक तपासणी करून सत्य समोर आणावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. या प्रकरणामुळे अचलपुर तसेच अमरावती जिल्ह्यात सामाजिक आणि राजकीय वातावरण तापले असून नागरिकांमध्ये भीती आणि संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले. अशा आशयाची माहिती पत्र परिषदेमध्ये आमदार प्रवीण तायडे यांच्या वतीने देण्यात आली.

# धारणी-चिखलदरा हादरले : गारपिटीचा कहर, शेतकऱ्यांचे लाखोंचे नुकसान

प्रतिनिधी ५ एप्रिल

**धारणी/चिखलदरा** : तालुक्यांमध्ये शनिवारी दुपारी अचानक आलेल्या वादळी पावसासह गारपिटीने मोठा तडाखा दिला. हवामान खात्याच्या अंदाजानुसार सुमारे २० मिनिटे सुरू असलेल्या या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. काटकुंभ, चुरणी परिसरात गहू, हरभरा यासह विविध पिकांचे नुकसान झाले असून अनेक ठिकाणी फळपिकांनाही मोठा फटका बसला आहे.



या गारपिटीमुळे शेतात उभे असलेले पीक आडवे झाले असून काढणीस आलेल्या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. विशेषतः संत्रा आणि मोसंबी बागांवर या पावसाचा गंभीर परिणाम झाला आहे. वादळी वाऱ्यामुळे काही ठिकाणी झाडे उन्मळून पडली, तर कच्च्या घरांचेही नुकसान झाले आहे. प्रशासनाच्या प्राथमिक अहवालानुसार सुमारे ११३ हेक्टर क्षेत्रातील पिकांचे नुकसान झाले आहे. दिवसाचे तापमान ४० अंश सेल्सिअसच्या आसपास असताना अचानक वातावरणात बदल होऊन वादळी पावसाने हजेरी लावली. त्यामुळे शेतकरी पूर्णपणे गाफील राहिले आणि मोठ्या संकटात सापडले.

धारणी, चिखलदरा तसेच आसपासच्या गावांमध्ये अवकाळी पावसाचा हा फटका वारंवार बसत असल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. गारपिटीमुळे अनेक ठिकाणी घरेही पडझड झाली असून जनजीवन विस्कळीत झाले आहे. सुदैवाने जीवितहानी टळली असली तरी आर्थिक नुकसान मोठ्या प्रमाणात झाले आहे. दरम्यान, नुकसानग्रस्त भागांचा पंचनामा सुरू असून शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्याची मागणी होत आहे. कृषी विभागाकडूनही परिस्थितीचा आढावा घेतला जात असून लवकरच मदत जाहीर होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### पूर्व विदर्भात हलक्या पावसाची शक्यता हवामान तज्ञ अनिल बंड यांचा अंदाज

५,६,७ एप्रिल रोजी पुर्व विदर्भात हलक्या पावसाची शक्यता. पश्चिम विदर्भात तुरळक अपवाद वगळता वातावरण सहसा कोरडे राहील. असे मत हवामान तज्ञ प्रा. अनिल म बंड अमरावती यांनी व्यक्त केले.

# विद्यापीठाच्या संशोधन केंद्राद्वारे स्टार्टअप्स कंपनीला सीड फंडाचे वितरण

## प्रगत शैक्षणिक जीवनाला समाजसेवेचे अंग असावे - कुलगुरु डॉ. मिलींद बारहाते

प्रतिनिधी ५ एप्रिल

**दर्यापूर** : सृष्टी वरील सर्व सजीव जीवनाच्या कल्याणासाठी संशोधन प्रगत शैक्षणिक जीवनाचे यश प्राप्त करतांना या यशाला समाजसेवेचे अंग निश्चित असावे असे मौलिक मार्गदर्शन संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरु डॉ मिलींद बारहाते यांनी केले . प्रा. गजानन भारसाकळे आणि प्रा. अक्षय काळमेघ संचालक, डंग्स अँड हर्ब्स प्रा. लि., माहुली ( धांडे ) ता . दर्यापूर यांना त्यांच्या स्टार्टअप साठी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ आणि महाराष्ट्र स्टेट इनोव्हेशन सोसायटी यांच्या वतीने सीड फंड वितरणासाठी निवड झाली होती .

यानुसार विद्यापीठाच्या इन्क्यूबेशन व संशोधन केंद्रामध्ये विद्यापीठाचे सन्मानिय कुलगुरू मा. डॉ. मिलिंद बारहाते यांचे



शुभहस्ते या फंडाचा धनादेश कंपनीला सूपूर्त करण्यात आला . यावेळी कार्यक्रम मंचावर इन्क्यूबेशन व रिसर्च सेंटर प्रमुख डॉ स्वाती शेरेकर यांची प्रमुख उपस्थिती होती . याप्रलंगी बोलतांना कुलगुरू डॉ बारहाते यांनी कार्यक्रमासाठी आवर्जून उपस्थितीत शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय अमरावतीच्या विद्यार्थ्यांना स्टार्ट अपला करीअर म्हणून प्राधान्य देण्याचे महत्वपूर्ण आवाहनही केले . या वेळी आपल्या यशाबद्दल मनोगत व्यक्त करतांना कंपनीचे संचालक प्रा . भारसाकळे यांनी गोसेवेतील या संशोधन कार्याची माहिती विषद केली . स्टार्टअपचा प्रवास मागील वर्षी विद्यापीठात आयोजित हॅकेथॉन स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवून सुरू झाला होता . या यशाच्या मान्यतेस्वरूप विद्यापीठाने कंपनी स्थापन करण्याची संपूर्ण प्रक्रिया स्वखर्चाने करून दिली . ज्यामुळे या स्टार्टअपचे रूपांतर एका प्रायव्हेट लिमिटेट कंपनीमध्ये झाले आहे . या यशामागे प्रा गजानन भारसाकळे यांचे गोरक्षण स्थळावरील कठोर परिश्रम आणि समर्पणाचे संशोधन कार्य खरोखरच प्रेरणादायी आहे. हा प्रवास एका संभाव्य युनिकॉर्नकडे वाटचाल करण्याची ही सुरुवात असून या संशोधन कार्याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष केंद्रीत झालेले आहे . तसेच या विद्यापीठ स्तरीय आशिर्वादाबद्दल सर्व स्तरातून स्टार्टअप कंपनीवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे . प्रा गजानन भारसाकळे व प्रा अक्षय काळमेध हे श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालय बाभूळगांव (अकोला) येथे सिव्हील इंजिनिअरिंग विभागात कार्यरत आहेत . या कार्यक्रमाचे प्रास्ताविक इंक्यूबेशन व रिसर्ज सेंटरचे सी ई ओ आनंद यादव यांनी तथा सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन व्यवस्थापक अमोल हिरूळकर यांनी केले . कार्यक्रमासाठी सेंटर मधील कर्मचारी नरेश मोवळे, रवी ढेंगळे व भावेश वारके यांनी परीश्रम घेतले .

# आंबेडकरी तत्त्वज्ञान हे आज जागतिक चिंतनाचा अविभाज्य भाग

प्रतिनिधी ५ एप्रिल

**अमरावती** : आंबेडकरी व्यवहारात मौलिक योगदान देऊन साहित्य चळवळीला सम्यक दिशादर्शन करणारे आदरणीय ताराचंद्र खांडेकर यांनी तत्वनिष्ठ परिवर्तनवादी चळवळीत महत्त्वाचे कार्य केले आहे त्यामुळे ताराचंद्र खांडेकर यांच्या गौरवार्थ आंबेडकरी विचार समितीचे आयोजन करण्यात आले होते या समितीचे उद्घाटन डॉक्टर प्राध्यापक महेंद्र भवरे मुंबई विद्यापीठ मुंबई यांच्या हस्ते करण्यात आले. आपल्या उद्घाटनिय भाषणात डॉ महेंद्र भवरे यांनी चळवळीत काम केलेल्या कार्यकर्त्यांच्या कार्याचे दस्तऐवजीकरण करणे अत्यंत गरजेचे असल्याचे आवर्जून सांगितले. जेणेकरून नवीन पिढीतील तरुणांना मागील पिढीचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून भविष्याची वाटचाल करता येईल सावित्रीबाई व महात्मा फुलांनी जे लिखाण केले ते जसे आजच्या तरुण तरुणींना आदर्शवत ठरले आहे तसेच पुढील पिढीसाठी जर आजच्या



कार्यकर्त्यांच्या त्यागाचा आलेख समोर राहिला तर त्यांना यातून प्रेरणा मिळाल्याशिवाय राहणार नाही आपल्या अध्यक्ष भाषणात माननीय ताराचंद्र खांडेकर यांनी समकालीन प्रश्नांवर विस्तृत चर्चा केली. आंबेडकरी विचार हा आज जागतिक चिंतनाचा एक अविभाज्य भाग झालेला आहे त्यातून सर्वकालिक कल्याणकारी विचारांची खरी ओळख होऊन त्यातून नवीन समाज घडविण्याची प्रक्रिया सुरू होते असे मत त्यांनी व्यक्त केले याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून कारा वाल्देकर ,इमो नारनवरे ,नरेंद्र शेलार ,बबन चहांदे यांनी आपले विचार व्यक्त करताना फुले आंबेडकरांचे विचारातून या देशाचा उत्कर्ष साधता येईल असे प्रतिपादन केले.

पहिल्या दिवशी दिनांक २८ मार्च २६ ला आंबेडकरी गझल जागर कार्यक्रमाचे आयोजन इ.मो .नारनवरे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले या कार्यक्रमात नंदकुमार दामोदरे ,सुदाम सोनुले ,संजय घरडे ,रोशन गजभिये ,देवीलाल रौराळे ,अतुल ढोणे ,अनिल अघम ,विनोद बागडे यांनी आपल्या गझल प्रस्तुत केल्या सूत्रसंचालन स्नेहल सोनटक्के हिने केले तर आभार कुंदा सोनुले यांनी मानले. दुसऱ्या दिवशी २९ मार्च २०२६ ला सकाळी दहा वाजता तिसर्या सत्राचा प्रारंभ कवी संमेलनाने करण्यात आला .कवी संमेलनाचे अध्यक्षस्थानी मान. गोविंद वाघमारे हे होते .या कवी संमेलनात बबन चहांदे ,मोरेश्वर सहारे ,नारायण थोरात ,गौतम ढोके, गणेश लांडगे,संजय मोखडे यांनी आपल्या रचना सादर केल्या. त्यानंतर झालेल्या दुसऱ्या परिसंवादात 'खांडेकरांचे साहित्य संस्कृती व चिंतन 'या विषयावर बोलताना खांडेकर हे आंबेडकरी चळवळीतील एक संघर्ष पुरुष आहे असे विधान प्राध्यापक सुखदेव ढाणके यांनी केले .खांडेकरांचे आर्थिक चिंतन या विषयावर बोलताना नरेंद्र शेलार यांनी खांडेकरांनी केलेल्या आंबेडकरवादी अर्थशास्त्रीय व श्रमिक कल्याण विषयक विचारांचा परामर्श घेतला माननीय इ .मों. नारनवरे यांनी खांडेकरांचे राजकीय चिंतन याविषयी विस्तृत भाष्य केले .परिसंवादाचे संचालन प्रा.डॉ. गजानन बनसोड यांनी केले.

त्यानंतर दुसऱ्या परिसंवादात 'इसवी सन २००० नंतरचे आंबेडकरी साहित्य 'या विषयावर आकाशवाणीचे निवृत्त अधिकारी माननीय बबन चहांदे यांचे अध्यक्षतेखाली अभ्यास पूर्ण चर्चा केल्या गेली.या परिसंवादात आंबेडकरी साहित्यातील समीक्षा व सौंदर्यशास्त्रीय लेखन या विषयावर बोलताना प्रा डॉ अशोक इंगळे यांनी इसवी सन २००० नंतरचे समीक्षा लेखन व सौंदर्यशास्त्रीय लेखनाचा चिकित्सकपणे आढावा घेतला याच परिसंवादात प्राध्यापक डॉक्टर भास्कर पाटील यांनी आंबेडकरी साहित्यातील वैचारिक लेखन विश्वात व्यापक पणे होणाऱ्या वैचारिक चिंतन या लेखनाचा आढावा घेतला.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
रविवार दि. ५ एप्रिल २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## गुडफ्रायडेनिमित्त खडुवर साकारले भगवान येशु ख्रिस्ताचे शिल्प



**वाशिम :** शहरातील टिळक चौक येथील रहिवासी हर्षल हिवसे या हरहुन्नरी कलावंताने आपल्या सुक्ष्म शिल्पकलेच्या माध्यमातून गुडफ्रायडेचे औचित्य साधून केवळ खडुवर भगवान येशु ख्रिस्ताचे चित्र रेखाटून आपल्या अद्भूत शिल्पकलेचे प्रदर्शन घडविले आहे.एकेकाळी वाकाटककालीन राजधानी असलेली व वत्सगुल्म्य महात्म्यनुसार १०८ देवस्थानांनी समृध्द असलेली व जगाच्या मध्यरेषेचा गौरव प्राप्त असलेली ऐतिहासिक वाशिमनगरी गुणवंत व कलावंतांची खाण आहे. या कलावंतांनी वेळोवेळी आपल्या अद्भभूत केलेचे प्रदर्शन घडवून वाशिमनगरीचे नाव सातासमुद्रापार पोहचविले आहे. वाशिम शहरातील हर्षल हिवसे या कलावंताने अतिशय सुक्ष्म शिल्प कलाकारीच्या माध्यमातून खडुवर येशु ख्रिस्ताचे चित्र रेखाटून वाशिम नगरीचा गौरव वाढविला आहे. या खडुवर सुंदर असा कलर दिल्यामुळे भगवान येशु ख्रिस्ताचे हे चित्र अगदी जिवंत वाटत असून पाहणाऱ्यांचे हात आपोआपच भक्तीभावाने जोडले जातात. जगातील सर्वात कमी उंचीचे खडुमध्ये कोरलेले हे शिल्प असल्याचा दावा हर्षल हिवसे यांनी केला आहे.

### खदान मालकाची अतिरीक्त उत्खननातून मुजोरी...

# ‘स्वामीत्वधनाची’ कोट्यवधीची चोरी !

*** महसूल विभागाचे अर्थपूर्ण दुर्लक्ष * सर्व खदानीची ड्रोनद्वारे मोजणी करण्याची मागणी**

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●







वाशीम जिल्ह्यामध्ये मागील ७/८ वर्षापासून समृध्दी महामार्ग आणि अकोला-नांदेड राष्ट्रीय महामार्गासह जिल्ह्यातील अनेक रस्त्याचे कामे मोठ्या प्रमाणात झाली. व इतरही रस्त्याचे कामे सुरू आहेत. या रस्त्याच्या कामासाठी मोठ्या प्रमाणात गौण खनिजाची आवश्यकता असल्याने वाशीम जिल्ह्यातील सहाही तालुक्यातील ‘राजाश्रय’ असलेल्या सत्ताधारी व विरोधी पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी गौण खनिजाच्या खदानी सुरू केल्या आहेत. ‘त्या’ खदानीमधून नियमबाह्य व अवैधरित्या गौण खनिजाचे उत्खनन करून त्या सर्व खदान मालकाची परिस्थिती ‘सुजलाम-सुफलाम’ झाली असून शासनाच्या कोट्यवधी रूपयाच्या महसूलाला खदान मालकानी महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांशी संगणमत करून कोट्यवधीचा चुना लावल्याची चर्चा जनतेमध्ये आहे. जिल्ह्यातील सर्व गौण खनिज खदानीची ड्रोनद्वारे मोजणी केल्यास सत्य समोर येवून महसूलात वाढ होईल.

वाशीम जिल्ह्यात पाच वर्षापूर्वी मोजक्याच गौण खनिजाच्या खदानी होत्या. नंतर या व्यवसायातून करोडपती झालेल्या खदान मालकाचा आदर्श डोळयासमोर ठेवून जिल्ह्यातील सत्ताधारी व विरोधी पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी कमी कालावधीमध्ये ‘मालामाल’ करणाऱ्या या व्यवसायामध्ये पदार्पण योगायोगाने ७ वर्षापूर्वी वाशीम जिल्ह्यातून समृध्दी महामार्ग व अकोला-नांदेड राष्ट्रीय महामार्गाच्या कामाचा श्रीगणेशा झाला. या दोन्ही महामार्गासह जिल्ह्यातील अनेक महत्वाच्या रस्त्याची कामे सुध्दा सुरू झालीत. या सर्व रस्त्याच्या कामासाठी मोठ्या प्रमाणात गौण खनिजाची गरज असल्यामुळे या रस्त्याचे काम घेणारे कंत्राटदार व जिल्ह्यातील काही लोकांनी त्यांना सोयीचे ठिकाण असलेल्या जागेवर गौण खनिज खदानीचे महसूल विभागाकडून परवाने काढले. संबंधित लोकांनी व कंत्राटदारांनी ‘त्या’ खदानीतून नियम बाह्य व अवैधरित्या गौण खनिजाची उत्खनन केल्याचा प्रकार वाशीम तालुक्यातील तामसाळा येथे उघडकीस आला आहे. मोन्टो कार्लो कंपनीला वाशीमच्या तहसीदाराने अतिरीक्त अवैध उत्खनन केल्याप्रकरणी ४० कोटी रूपयाची रॉयल्टी भरण्याचे आदेश दिले होते. या कारवाईमुळे वाशीम तालुक्यातील महसूलाचे उदिष्ट पुर्ण झाले असले तरी वाशीम तालुक्यातील सर्वच गौण खनिजाच्या खदानीमध्ये क्षमतेपेक्षा जास्त नियमबाह्य व अवैधरित्या गौण खनिजाणचे उत्खनन झाल्याच्या तक्रारी ग्रामस्थांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केल्या आहेत. वाशीम, रिसोड, मालेगाव, मंगरूळपीर, मानोरा आणि कारंजा लाड, या सहाही तालुक्यातील सर्वच गौण खनिज खदान मालकांनी मागील ७ ते ८ वर्षात किती ब्रास गौण खनिज उत्खननाची ‘स्वामीत्वधनाची’ (रॉयल्टीची) रक्कम भरली आहे. आणि त्या खदानीतून किती ब्रास गौण खनिजाचे उत्खनन केले आहे. याची गौणद्वारे मोजणी करून जिल्ह्यातील सर्व गौण खनिजाच्या खदान मालकांनी शासनाचा किती कोटी रूपयाचा महसूलाला ‘चूना’ लावला ही बाब उघडकीस येणार आहे.

महसूल विभागातील जबाबदार अधिकाऱ्यांनी आपल्या वैयक्तीक स्वार्थाला बाजूला ठेवून वाशीम जिल्ह्यातील सर्व खदानीची ड्रोनद्वारे मोजणी करून सर्व खदान मालकांकडून त्यांनी चोरी केलेल्या रॉयल्टीची रक्कम दंड व्याजासह वसूल करण्यासाठी पुढाकार घ्यावा अशी जनतेची मागणी आहे.




## थोडक्यात

### कारंजा येथे छत्रपती शिवाजी महाराज स्मृतिदिन



● सिटी न्युज ब्युरो @ कारंजा ●

कारंजा येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मृतिदिनानिमित्त भावपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याजवळ उपस्थितांनी त्रिवार वंदन करून त्यांच्या पावन स्मृतीस अभिवादन केले.कार्यक्रमादरम्यान उपस्थितांनी महाराजांच्या कार्याची आठवण करत त्यांना पुष्पहार अर्पण केले तसेच मेणबत्ती प्रज्वलित करून आदरांजली वाहिली.‘रयतेपायी तो जन्मभर झिजला,रक्षणात तयाच्या गडकोटी वसला ’ अशा ओळींमधून शिवचरित्राचा गौरव करण्यात आला.या प्रसंगी अरुण भाऊ खंडागळे संजू भाऊ काकडे,म्प्रवीण भाऊ कानकिरड सर,मोरे सर,रविभाऊ ठाकरे, विजय गागरे,दीपक काळे,अक्षय जगताप,सरक,दिपक गाडगे यांच्यासह मराठा सेवा संघ व अखिल भारतीय मराठा महासंघाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.संपूर्ण कार्यक्रम श्रद्धा, आस्था आणि शिवप्रेमाने भरलेला असून उपस्थितांनी एकमुखाने शिवाजी महाराजांच्या कार्याचा आदर्श पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्याचा संकल्प केला.

### पाणवठे पडले कोरडे,वन्य प्राण्यांची पाण्यासाठी भटकंती



● सिटी न्युज ब्युरो @ मेडशी ●

मालेगांव तालुक्यांतील मेडशी वन परिक्षेत्र अंतर्गत येत असलेल्या जंगला मध्ये वन्य प्राण्यांची संख्या खूप मोठ्या प्रमाणावर आहे. रोही, हरीण,काळवीट, बिबट, कोल्हे, माकड, सायाळ ह्या प्राण्यासह राष्ट्रीय पक्षी मोर सह मिटू,कावळा,बगळा सह लहान पक्षीची संख्या ही ह्या जंगलात खूप मोठ्या प्रमाणावर आपणास पाहायला मिळते.

मेडशी गावाकडील पश्चिम दिशेस असलेल्या जंगलात काही लहान मोठे तलाव,धरण, तळे सुद्धा आहे.मात्र मार्च महिना संपला की सदर वन्य प्राण्यांच्या पिण्याचे स्त्रोत कोरडे पडतात.त्यामुळे वन्य प्राण्यांची पिण्याचा गंभीर प्रश्न निर्माण होतो. एकतर जंगलात चारा पण संपुष्टात येतो या कालावधी मध्ये आणि त्यात पाणी पण आटून जाते.त्यामुळे भुके-पाण्याने व्याकूळ वन्य प्राणी मानवी वस्ती कडे उन्हाळी पिके घेणाऱ्या शेतकर्यांचा शेतीकडे वाटचाल करून त्यांचे आतोनात नुकसान करतात.तरी वनविभागने तातडीने वन्य प्राण्यांच्यासाठी कुत्रिम पाणवठे तयार करून त्यांच्या पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी अशी मागणी वन्य पशू प्रेमी कडून होत आहे.

## उन्हाळा झाला सुरू, रसवंतीचे वाजु लागले घुंगरू !

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●





उन्हाळ्याची चाहूल लागताच शहरासह ग्रामीण भागात विविध महामार्गावर सर्वत्र शीतपेयांची दुकाने थाटलेली दिसत आहेत. जोपर्यंत उन्हाची चटके जाणवत नव्हते, तोपर्यंत ग्राहक वळत नव्हते असे चित्र निर्माण होत आहे. परंतु गेल्या काही दिवसापासून तापमानात मोठी वाढ झाल्याने नागरिक शीतपेय, रसवंती गृहाकडे लागले आहेत. उन्हाळ्याची तीव्रता जाणवत असली तरी शीतपेय आणि रसवंती गृह विक्री करणाऱ्या विक्रेत्यांचे अच्छे दिन आल्याचे दिसून येत आहे. उन्हाळ्याची चाहूल लागताच रसवंती गृहाचे घुंगरू वाजू लागले असून उसाच्या रसासह थंड लस्सी, आईस्क्रीम शीतपेय ना पसंती देत आहेत. रस्त्यालगत अनेक ठिकाणी स्टॉल लागले असून रसवंतीगृह थाटलेली दिसत आहेत. कडक उन्हात कामानिमित्त घराबाहेर पडणार यांना उन्हाच्या तडाख्यात ही शीतपेय रसवंती गृहे दिलासादायक वाटत असल्यामुळे या शीतपेय रसवंती गृहामध्ये ग्राहकांची वर्दळ वाढत असल्याचे दिसून येत आहे. थंड पाणी, उसाचा रस, मठ्ठा, लस्सी, आईस्क्रीम, लिंबू शरबत, अशा वेगवेगळ्या प्रकारची दुकाने लागली आहेत. उन्हाचे चटके जाणवू लागले असल्याने शरीराला ऊर्जा व तहान भागविण्यासाठी नींबू शरबत उसाचा रस आईस्क्रीम कुल्फी ज्यूस यासारख्या थंडपेयची गरज भासते म्हणून सर्वत्र ही दुकाने थाटलेली दिसून येत आहे. सध्या थंडपेयना मागणी वाढली आहे. उन्हाची चटके जाणवत नव्हते तोपर्यंत ग्राहक रसवंतीकडे वळत नव्हते असे चित्र निर्माण होत होते. परंतु गेल्या काही दिवसापासून तापमानात मोठी वाढ झाल्याने नागरिक शीतपेय रसवंती गृहाकडे वळू लागली आहेत. उन्हाळ्याची तीव्रता जाणवत असली तरी शीतपेय आणि रसवंती गृह उन्हाळ्याची चाहूल लागताच रसवंती चे घुंगरू वाजू लागले असून उसाच्या रसासह थंडी लस्सी आईस्क्रीम शीतपे यांना पसंती देत आहेत..



**चाहूल उन्हाळ्याची...**

**उन्हाळयाची चाहूल लागताच गरीबांचे फ्रिज म्हणून ओळखले जाणारे माठ बाजारात विक्रीस आले आहेत.**

### उन्हाची तीव्रता वाढल्याने...

## रस्त्यावर शुकशुकाट !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●



जिल्ह्यात गेल्या आठवडाभरापासून उन्हाची तीव्रता वाढल्याने दुपारच्या वेळी रस्त्यांवर शुकशुकाट दिसून येत आहे. सद्यस्थितीत उन्हाचा पार ४० अंशावर गेला असल्याने आगामी काळात उन्हाच्या झळा वाढण्याची शक्यता हवामान खात्याकडून वर्तविण्यात येत आहे. उन्हाची तीव्रता अचानक वाढल्याने नागरिकांना उकाड्याचा सामना करावा लागत असून कुलरचा वापर वाढला आहे.

उन्हाळा सुरू होण्यापूर्वीच कडाक्याचे ऊन जाणवत असल्याने त्याचा परिणाम वाहतूक, बाजारपेठ तसेच दैनंदिन कामकाजावर होत असल्याने जनजीवन प्रभावित झाले आहे. दुपारी बारानंतर उन्हाचे चटके जाणवत असल्याने कामानिमित्ताने घराबाहेर पडणारे नागरिक उन्हापासून सुरक्षिततेची काळजी घेवून बाहेर पडत आहेत. वाढत्या उन्हाचा परिणाम वाहतूक वर्दळीसह हातगाडीधारक विविध वस्तू विक्रेते तसेच फेरीवाले यांच्या व्यवसायावर देखील झाला आहे. दुपारच्या वेळी उन्हाचे चटके सहन करावे लागत असल्यामुळे मुख्य रस्त्यावरची वाहतूक विरळ झाल्याचे चित्र दिसून येते आहे. दरदविशी देवदर्शनासाठी भाविकांच्या गर्दीमुळे भरगच्च होणारी मंदिरे उन्हामुळे दुपारच्या वेळी ओस दिसून येत आहेत.

### वाशीम नगर पालिकेला भ्रष्टाचाराने घेरले...

## पार्किंगसह प्रसाधनगृह चोरले!

*** जिल्हा व पालीका प्रशासनाचे दुर्लक्ष.**
***मुख्य बाजारपेठेसह प्रमुख चौकांमध्ये पार्कीग नसल्यामुळे नागरिकांना त्रास**
***सनदी अधिकाऱ्यांनी पुढाकार घेवून शहरातील समस्या सोडवाव्यात**

● सिटी न्युज ब्युरो @वाशीम ●







वाशीम शहरातील नगरपालीकेच्या आणि अनेक खासगी व्यापारी संकुलातील पार्किंगच्या जागेसह प्रसाधन गृहाच्या जागा गायब झाल्या आहेत. बहुतांश पार्किंग आणि प्रसाधन गृहाच्या जागेवर संबंधित व्यापारी संकुलाच्या मालकांनी दुकाने थाटली आहेत तर पालिकेने या प्रसाधन गृहाच्या जागा तत्कालीन पालिकेच्या सत्ताधारी पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या निकटवर्तीयांना दिल्याची चर्चा आहे.


सध्या वाशीम पालिकेच्या मुख्याधिकारी पदाची सूत्रे परिविक्षाधीन सनदी अधिकारी अपूर्वा बासूर यांनी स्वीकारली असून आता त्यांनी पुढाकार घेवून वाशीम शहरातील पालीकेच्या व खासगी व्यापारी संकुलातील पार्किंग सह प्रसाधनगृहाच्या सर्व जागा मोकळ्या कराव्यात अशी शहरवासीयांची मागणी आहे. वाशीम शहरामध्ये सर्व प्रथम रविवार बाजारातील खुल्या जागेवर पालीके ने रस्त्याच्या दुतर्फा व्यापारी संकुल बांधले. या व्यापारी संकुलाच्या मध्यभागी असलेल्या रस्त्याच्या कडेला पालिकेने प्रसाधनगृहे बांधली होती. तेव्हा रविवार बाजारामध्ये मोठ्या प्रमाणात खुली जागा होती. आणि शहरात व ग्रामीण भागात वाहनांची संख्या पण मोजकी होती. कालांतराने वाशीम शहरातील बाजारपेठ वाढल्यामुळे पुन्हा २५ वर्षापूर्वी पालिका प्रशासनाने रविवार बाजार व बैलबाजाराच्या जागेवर बिओटी तत्वावर व्यापारी संकुल उभारण्यासाठी पुढाकार घेतला. महात्मा फुले मार्केट मध्ये पार्किंगची व्यवस्था व प्रसाधनगृहाची व्यवस्था न केल्यामुळे आज महात्मा फुले मार्केटमध्ये सर्वत्र घाणीचे साम्राज्य निर्माण झाल्याचे चित्र आहे. तसेच बैल बाजारातील व्यापारी संकुलाची सुद्धा हीच अवस्था आहे: या सर्व समस्या सोडविण्यासाठी आजपर्यंत पालिका प्रशासनाने व जिल्हा प्रशासनाने पुढाकार घेतला नसल्याचा आरोप नागरिकांकडून केल्या जात आहे.

### रोजगार हमीत समानता हवी...

## रोजगार हमीतून विहीर मंजुरी द्यावी!

● प्रभाकर नाईकवाडे @ केनवड ●

**जिल्ह्यातील अनेक तालुक्यांमध्ये संस्थान (मंदिर) मालकीची मोठ्या प्रमाणावर शेती आहे. मात्र, या जमिनींसाठी रोजगार हमी योजनेअंतर्गत विहीर मंजुरी मिळत नसल्याने संस्थानच्या उत्पन्नावर परिणाम होत असल्याचे चित्र आहे.**






**संस्थान शेतीसाठी रोजगार हमी योजनेत विहीर मंजुरीची मागणी**

शेतकऱ्यांना, विशेषतः अल्पभूधारकांना रोजगार हमी योजनेतून विहिरी मंजूर केल्या जातात. त्यामुळे त्यांच्या शेतीचे उत्पन्न वाढण्यास मोठी मदत होते. जसे अल्पभूधारक शेतकऱ्यांना रोजगार हमी योजनेअंतर्गत विहिरीचा लाभ मिळतो आणि त्यामुळे त्यांच्या शेतीचे उत्पन्न वाढते, त्याचप्रमाणे संस्थान शेतीतही विहीर मंजूर करण्यात यावी, अशी मागणी पुढे येत आहे. यामुळे संस्थानच्या शेतीला सिंचनाची सोय उपलब्ध होऊन उत्पादन वाढेल आणि परिणामी संस्थानचे उत्पन्नही वाढण्यास चालना मिळेल. जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये संस्थानच्या नावावर शेती असून ती पाण्याअभावी पूर्ण क्षमतेने वापरली जात नाही. परिणामी उत्पादन घटते आणि संस्थानच्या आर्थिक उत्पन्नावर मर्यादा येतात. रोजगार हमी योजनेतून विहिरी मंजूर झाल्यास या जमिनींवर सिंचनाची सोय होऊन शेती अधिक उत्पादनक्षम होणार आहे.विशेष म्हणजे, अनेक ठिकाणी संस्थानचे अध्यक्ष व सचिव यांच्याकडून ही मागणी सातत्याने व्यक्त केली जात आहे. ’शेतकऱ्यांना जसा लाभ मिळतो, तसाच लाभ संस्थान शेतीलाही मिळावा,’ अशी त्यांची भूमिका आहे. संस्थान शेतीतून मिळणारे उत्पन्न मंदिराच्या देखभालीसह धार्मिक कार्यक्रम, सामाजिक उपक्रम आणि गरजूंसाठी मदत यासाठी वापरले जाते. त्यामुळे या उत्पन्नात वाढ होणे हे केवळ संस्थानपुरते मर्यादित न राहता समाजहितासाठीही उपयुक्त ठरणार आहे.

दरम्यान, जिल्ह्यातील अनेक तालुक्यांतील गावांमधून अशीच मागणी पुढे येत असून शासनाने याबाबत सकारात्मक भूमिका घेऊन धोरणात आवश्यक बदल करावेत, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## शेषराव पिराजी धांडे यांना प्रज्ञा साहित्य वाड्;मय पुरस्कार जाहीर

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●



१२ जानेवारी रोजी वाशिम येथे होणाऱ्या आंबेडकर साहित्य संमेलनात कवी शेषराव पिराजी धांडे यांच्या ऐकून कवितेच्या सेवावृत्तीला प्रज्ञा साहित्य वाड्;मय पुरस्कार देण्यात येणार आहे. रोख राशी , स्मृती चिन्ह,शाल व बुके या स्वरूपात देण्यात येणार आहे.

कवी शेषराव पिराजी धांडे यांचे एकूण पाच कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. विद्रोही, रस्ता सोडून चालला कुठे..?, आमचा आलेख कोरचं..!, बिघडलेले होकायंत्र, मैलाच्या दगडांचा लिलाव हे कविता संग्रह संग्रह प्रसिद्ध असुन त्यांची कविता मुंबई विद्यापीठात, स्वा.रा.ति. मराठवाडा विद्यापीठात,व जळगाव येथे अभ्यासक्रम आहे. तसेच अनेक विद्यार्थी विद्यापीठस्तरावर संशोधनाचे कार्य करत आहेत. धांडे हे नव्वद पासून सातत्याने कविता लेखन करतात. त्यांच्या कविता संग्रहास अस्मितादर्श वाड्;मय पुरस्कार, नामदेव ढसाळ काव्य पुरस्कार, आण्णा भाऊ साठे काव्य पुरस्कार, निरंजन उजगरे पुरस्कार, उत्तर पवार काव्य पुरस्कार, कुसुमाग्रज काव्य पुरस्कार इतर सात पुरस्कार त्यांच्या पाच कवितासंग्रहास प्राप्त झाली आहेत. त्यांच्या चार कविता संग्रहावर डॉ.संजय कांबळे यांनी समीक्षा ग्रंथांचे संपादन अस्वस्थ कार्यकर्ताची कविता ह्या शिर्षकानी केले आहे. शेषराव धांडे हे युवकभारती इयत्ता ११/१२वी संपादन मंडळ सदस्य होते. आयोजन- फुले ,शाहू ,आंबेडकर साहित्य संमेलन २००१ वाशिम अस्मितादर्श साहित्य संमेलन २०१६ वाशिम विशेष सहभाग जागतिक कृत्या फाऊंडेशन पोइट्री फेस्टीवल मराठीचे प्रतिनिधीत्व केले.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा

रविवार, दि. ५ एप्रिल २०२६

http://epaper.citynewssuperfast.com

## शहर तसेच ग्रामीण भागातील रस्त्यावरील खड्डे त्रासदायक

खामगाव. शहर तसेच ग्रामीण भागातील रस्त्यावर झालेले खड्डे डोकेदुखी ठरत आहे. त्यांची दुरूस्ती तातडीने करण्यात यावी अशी मागणी केली जात आहे. नगरपालिका प्रशासन आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने याकडे लक्ष द्यावे. जेणेकरून नागरिकांची गैरसोय होणार नाही. या बाबतीत नेहमी आवाज उचलून देखील काहीही मार्ग निघत नाही. त्यामुळे संताप व्यक्त केला जातो आहे. अगदी आंदोलन करण्याची भाषा वापरली जाते. यंत्रणेने याकडे लक्ष द्यावे अशी मागणी आहे. थोडा जरी पाऊस झाला तरी रस्त्यावर चालणे कठीण जाते. खड्डयाचा अंदाज येत नाही. रात्री तर भीत भीत वाहने चालवावी लागत आहे. नागरिकांची ओरड होऊन देखील मार्ग निघत नाही. त्यामुळे नागरिक त्रासले आहेत. इतकेच नाही तर संताप व्यक्त केला जातो आहे. त्यामुळे या कामांना प्राधान्य द्यावे अशी मागणी केली जात आहे.

स्वच्छतेचा अभाव

# शंकर नगरमध्ये घाणीचे साम्राज्य, नागरिक त्रस्त

प्रतिनिधी ५ एप्रिल

**खामगाव :** खामगाव शहरातील शंकर नगर परिसरात सध्या स्वच्छतेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून संपूर्ण भागात घाणीचे साम्राज्य पसरलेले दिसून येत आहे. परिसरातील विविध रस्ते, गल्लीबोळ तसेच सार्वजनिक ठिकाणी मोठ्या प्रमाणावर कचरा साचलेला असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

मुख्य रस्त्यावर सांडपाणी वाहत असल्यामुळे परिसरात तीव्र दुर्गंधी पसरली आहे. काही ठिकाणी साचलेल्या पाण्यामुळे डासांची उत्पत्ती वाढली असून डेंग्यू, मलेरिया यांसारख्या आजारांचा धोका वाढला आहे. नागरिकांना रोजच्या जीवनात मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.





याशिवाय, रस्त्याच्या मध्यभागीच कचऱ्याचे ढीग साचून अक्षरशः 'कचरा कुंडी' तयार झाली आहे. या कचऱ्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत असून अपघाताचा धोका देखील वाढला आहे. प्लास्टिक, अन्नाचे अवशेष व इतर घाण यामुळे परिसर अधिकच अस्वच्छ झाला आहे.

या सर्व प्रकारामुळे स्थानिक नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले असून, संबंधित नगरसेवक व स्वच्छता कंत्राटदार यांच्या कार्यक्षमतेवर मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. नागरिकांच्या मते, नियमित साफसफाई न होणे, कचरा वेळेवर न उचलणे आणि सांडपाण्याची योग्य व्यवस्था न करणे ही प्रशासनाची मोठी निष्काळजीपणा आहे.

स्थानिकांनी अनेक वेळा नगरपरिषद प्रशासन, नगरसेवक तसेच संबंधित स्वच्छता कंत्राटदारांकडे तक्रारी केल्या असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही, त्यामुळे नागरिकांमध्ये नाराजी अधिक तीव्र झाली आहे.

विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना या अस्वच्छतेचा मोठा त्रास सहन करावा लागत असून सार्वजनिक आरोग्य धोक्यात आले आहे. परिस्थिती अशीच राहिल्यास मोठ्या प्रमाणावर आजार पसरू शकतात, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

तरी संबंधित नगरसेवकांनी तातडीने या समस्येकडे लक्ष देऊन जबाबदारी स्वीकारावी, तसेच स्वच्छता कंत्राटदारांवर योग्य कारवाई करून नियमित साफसफाई, कचरा व्यवस्थापन आणि सांडपाणी निचरा यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## विहीर खोदकामात सोलरपंपांचे नुकसान

### महावितरणचा ढिसाळ कारभार

प्रतिनिधी ५ एप्रिल

**दे. राजा :** तालुक्यात शेतीसाठी अखंड वीजपुरवठा मिळावा आणि पिकांना वेळेवर पाणी देता यावे, या उद्देशाने शासनाने सोलर पंप बसवण्याचे आवाहन केले होते. या योजनेला उत्स्फूर्त प्रतिसाद देत हजारो शेतकऱ्यांनी आपल्या शेतात सोलरपंप बसवले असून महावितरणनेही ही सुविधा उपलब्ध करून दिली आहे. मात्र, आता हेच सोलर शेतकऱ्यांसाठी मोठी डोकेदुखी ठरत असल्याचे वास्तव समोर येत आहे. पंप दरम्यान, पंचायत समितीमार्फत अनुदानित विहिरी खोदण्याचे तसेच खाजगी विहिरी खोदकाम तालुक्यात जोमात सुरू आहे. पाण्याची उपलब्धता वाढवण्यासाठी हा महत्त्वाचा

उपक्रम असला तरी विहीर खोदकामादरम्यान होणाऱ्या ब्लास्टिंगमुळे गंभीर समस्या निर्माण होत आहेत. ब्लास्टिंगवेळी उडणारे दगड थेट सोलर पॅनलवर पडत असल्याने त्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे.

या प्रकारामुळे शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसत असून सोलर प्लेटा तुटणे, यंत्रणेची हानी होणे अशा घटना वाढल्या आहेत. तसेच शेजारील शेतांमध्येही सोलर पंप बसवलेले असल्याने उडणारे दगड शेजाऱ्यांचे पंपांवर पडून वाद निर्माण होत आहेत. अनेक ठिकाणी हे वाद भांडणात परिवर्तित होऊन काही प्रकरणे पोलीस ठाण्यापर्यंत पोहोचत असल्याचे दिसून येते.

सध्याच्या परिस्थितीत शेतकरी व विहीर खोदकाम करणारे मजूर दोघेही या समस्येमुळे त्रस्त झाले आहेत. विहिरीची खोली व रुंदी वाढवण्याचे काम अडथळ्यात येत असून भविष्यात पाण्याचा प्रश्न अधिक गंभीर होण्याची भीती व्यक्त होत आहे.

# इलेक्ट्रीक वायर चोरणारी टोळी सक्रीय

### दोन फरार, एकास अटक

प्रतिनिधी ५ एप्रिल

**खामगाव :** डीपी र

मलकापूर शहरातील मुंदडा पेट्रोल पंपाजवळील पुलावर मध्यरात्रीच्या सुमारास इलेक्ट्रीक पोलवरील तार कापून चोरी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या टोळीचा पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या कारवाईत एका आरोपीला रंगेहात पकडण्यात आले असून, त्याचे तीन साथीदार अंधाराचा फायदा घेऊन पसार झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार,

शनिवारी ४ एप्रिल रोजी मलकापूर ग्रामीणचे पोलीस उपनिरीक्षक प्रशांत राठोड हे परिसरातून जात असताना त्यांना मुंदडा पेट्रोल पंपाजवळील पुलावर काही संशयास्पद हालचाली दिसून आल्या. काही इसम इलेक्ट्रीक पोलवरील तार कटरच्या साह्याने कापण्याचा प्रयत्न करत होते. पोलिसांनी तातडीने छापा टाकला असता, पोलिसांना पाहताच आरोपींची पळापळ सुरू झाली. या धावपळीत शेख नदीम शेख अकील (२५), रा. मुक्ताईनगर याला पोलिसांनी शिताफीने ताब्यात घेतले. मात्र, त्याचे इतर तीन अनोळखी साथीदार त्यांच्या दोन दुचाकी घटनास्थळीच सोडून अंधाराचा फायदा घेत पळून जाण्यात यशस्वी झाले. घटनास्थळावरून दोन दुचाकी वाहने क्रमांक MH-28-AN-3464 आणि MH-04-HX-8150 किंमत २०,०००/- रुपये, तार कापण्याचे साहित्य किंमत १,२००/- रुपये असा एकूण २१,२०० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. मलकापूर शहर पोलिसांनी या प्रकरणी कलम ३०३(२), ६२, ३(५) नुसार गुन्हा दाखल केला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास सपोनि दिलीप राठोड करीत आहे.

## तरुणीची आत्महत्या; प्रियकर अटकेत

प्रतिनिधी ५ एप्रिल

**खामगाव:** जळगाव जामोद तालुक्यातील एका गावात तरुणीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना शनिवारी घडली. या प्रकरणी पोलिसांनी तरुणीच्या प्रियकराला ताब्यात घेतले आहे.

प्राथमिक माहितीनुसार, पिडित तरुणीने मानसिक त्रासामुळे टोकाचे पाऊल उचलल्याचा आरोप करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, काही वर्षापूर्वी दोघांमध्ये प्रेम संबंध होते. त्यानंतर कुटुंबीयांच्या समजुतीनंतर हा संबंध संपुष्टात आला होता. पुढे संबंधित तरुणीचा साखरपुडा झाल्यानंतर, संशयिताने पूर्वीचे काही आक्षेपार्ह फोटो संबंधित कुटुंबाकडे पाठविल्याचा आरोप आहे.

# डीपी रोडवरील मुख्य जलवाहिनी फुटली

## परिसरातील पाणीपुरवठा तात्पुरता बंद !

प्रतिनिधी ५ एप्रिल

**खामगाव :** डीपी रोड परिसरातील मुख्य पाणीपुरवठा जलवाहिनी नाली बांधकामाच्या कंत्राटदाराकडून फुटल्याची घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे संबंधित भागातील पाणीपुरवठा तात्पुरता बंद ठेवण्यात आला असून, नागरिकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे.

नाली बांधकाम करताना खोदकामादरम्यान जलवाहिनीला धक्का लागल्याने ती फुटली. यामुळे मोठ्या प्रमाणावर पाण्याची गळती होऊन पुरवठा खंडित झाला. घटनेची माहिती मिळताच नगरपालिका प्रशासनाने तातडीने घटनास्थळी धाव घेत दुरुस्तीचे काम हाती घेतले आहे.

नगरपालिकेकडून दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर सुरू असून, जलवाहिनी दुरुस्त होईपर्यंत पाणीपुरवठा सुरळीत होणार नसल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. त्यामुळे डीपी रोड परिसरातील नागरिकांना पाण्याच्या टंचाईचा सामना करावा लागत आहे.

प्रशासनाने नागरिकांना पाण्याचा

काटकसरीने व योग्य वापर करण्याचे आवाहन पालिका प्रशासनाने केले आहे, तसेच दुरुस्तीचे काम शक्य तितक्या लवकर पूर्ण करून पाणीपुरवठा पूर्ववत केला जाईल, असे आश्वासनही देण्यात आले आहे. दरम्यान, अशा प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती



टाळण्यासाठी बांधकाम कामांदरम्यान अधिक काळजी घेण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

## धाड येथे पाणीटंचाई आढावा बैठक

प्रतिनिधी ५ एप्रिल

**बुलढाणा :** तालुक्याला पाणी टंचाईचा सामना करावा लागू नये, यासाठी बुधवार १ एप्रिल रोजी देशमुख टावर, धाड येथे चिखली विधानसभा मतदारसंघाच्या आमदार सौ. श्वेताताई महाले पाटील यांच्या अध्यक्षतेखाली 'बुलढाणा तालुका पाणी टंचाई' आढावा बैठक आयोजीत करण्यात आली होती. यावेळी त्यांनी संबंधित विभागाचा आढावा घेतला.

हातपंप दुरुस्ती, विहीर अधिग्रहण, विहीर दुरुस्ती, पाईपलाईन अशा विविध उपाय-योजना तत्काळ करून नागरिकांना सुलभ पाणी पुरवठा करण्यात यावा, जलजीवन मिशनची प्रलंबित कामे लवकर पूर्ण करावी. जलजीवन मिशन अंतर्गत ३४ पैकी १६ गावच्या योजना पूर्ण झाल्या आहेत. प्रलंबित निधी केंद्र सरकारने दिला असून तो निधी त्या विभागाला मिळणार आहे. प्रलंबित असलेल्या योजना तत्काळ पूर्ण कराव्या. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणकडे ज्या योजना आहेत, त्या तत्काळ पूर्ण करण्याच्या सूचना आ. श्वेताताई महाले यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. या बैठकीस गटविकास अधिकारी अमिता पवार, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष देविदास पाटील जाधव, संजय गाडेकर, नायब तहसीलदार अनंता पाटील, भाजपानेते ॲड. सुनील देशमुख, अनिल जाधव, योगेश राजपुत, नीलेश गुजर, प्रदीप टाकसाळ, अमोल शिंदे, विशाल विसपुते, नितेश खुसाळकर, किरण पाटील महावितरण उपकार्यकारी अभियंता कायंदे, यांच्यासह सरपंच, सचिव उपस्थित होते.

## रेणुकादेवी यात्रेनिमित्त चिखली बसस्थानकावर भाविकांना खिचडीचे वाटप

प्रतिनिधी ५ एप्रिल

**चिखली :** आई रेणुकादेवी यात्रेनिमित्त चिखली बसस्थानक परिसरात भाविकांसाठी सेवा उपक्रम राबवण्यात आला. यावेळी सुमारे २ हजार भाविकांना खिचडीचे वाटप करण्यात आले. आगार व्यवस्थापक संतोष जोगदंडे व खंडागळे बंधूच्या हस्ते हा उपक्रम राबविण्यात आला.

यात्रेनिमित्त मोठ्या संख्येने येणाऱ्या भाविकांची गैरसोय होऊ नये, तसेच प्रवासात असलेल्या नागरिकांना अल्पोपहार मिळावा या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. बसस्थानक




परिसरात दिवसभर भाविकांची गर्दी दिसून येत असताना स्वयंसेवकांनी

प्रधानमंत्री भारतीय जन औषधी शिस्तबध्द पध्दतीने खिचडीचे वितरण केले. या उपक्रमाचे उ?द्घाटन

आगार व्यवस्थापक संतोष जोगदंडे तसेच बाळासाहेब उर्फ विश्वासराव खंडागळे व भारत खंडागळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी 'सेवा हीच खरी श्रद्धा' असल्याचे सांगत अशा उपक्रमांची गरज अधोरेखित केली. कार्यक्रमात स्थानिक कार्यकर्ते व स्वयंसेवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. भाविकांनीही या उपक्रमाचे कौतुक करत आयोजकांचे आभार मानले.

## महसूल वसुलीत संग्रामपूर तालुका अव्वल

### जळगाव दुसऱ्या, खामगाव तिसऱ्या स्थानावर!

प्रतिनिधी ५ एप्रिल

**खामगाव:** बुलढाणा जिल्ह्याने महसूल वसुलीचे एकूण उद्दिष्ट ११७.९७टक्क्यांनी पूर्ण केले असून, जिल्ह्यातील १३ तालुक्यांपैकी संग्रामपूर तालुका अव्वल ठरला आहे. संग्रामपूर तालुक्याने १५२.४९ टक्के वसुली करत प्रथम क्रमांक पटकावला, तर जळगाव जामोद तालुका ११८.९५ टक्के वसुलीसह दुसऱ्या क्रमांकावर राहिला आहे.

खामगाव तालुक्याने १०८ टक्के, तर नांदुरा तालुक्याने १०७.८० टक्के वसुली करत अनुक्रमे तिसरा आणि चौथा क्रमांक मिळवला आहे. जिल्ह्यासाठी महसूल वसुलीचे उद्दिष्ट ४,६४९.४७लाख रुपये निश्चित करण्यात आले होते.त्यापैकी ३१ मार्चपर्यंत प्रत्यक्ष वसुली ४,९०८.३७ लाख रुपये झाली असून, जमीन महसूल वसुलीचे उद्दिष्ट १०५.५६ टक्क्यांनी पूर्ण झाले आहे.१३ तालुक्यांनी उद्दिष्टासाठी प्रयत्न केले. तसेच गौण खनिज वसुलीचे उद्दिष्ट ९००० लाख रुपये देण्यात आले होते. प्रत्यक्षात १०,७३८ लाख रुपयांची वसुली झाली असून, हे उद्दिष्ट ११९.३२ टक्क्यांनी पूर्ण करण्यात आले आहे. एकूण महसूल आणि गौण खनिज वसुलीचे उद्दिष्ट १३,६४९.४७ लाख रुपये होते. त्यापैकी १६,१०१.७५ लाख रुपयांची वसुली करून जिल्ह्याने ११७.९७ टक्के उद्दिष्ट साध्य केलेआहे. जळगाव जामोद उपविभागाने महसूल व गौण खनिज वसुलीत प्रथम क्रमांक मिळवला आहे. संग्रामपूर तालुक्याने दीडपट वसुली करत प्रथम क्रमांक मिळवला, तर जळगाव जामोद तालुका दुसऱ्या स्थानावर राहिला आहे. खामगाव व नांदुरा तालुक्यांनी तिसरा व चौथा क्रमांक पटकावला आहे. संग्रामपूर व जळगाव जामोद तालुक्यांनी कामगिरी केल्याबद्दल उपविभागीय महसूल अधिकारी शैलेश काळे यांनी तहसीलदार, नायब तहसीलदार, तलाठी व महसूल कर्मचाऱ्यांना गौरविले.

# आरटीई प्रवेशासाठी चुरस ; लॉटरी प्रक्रिया लवकरच

### एसएमएसद्वारे पालकांना मिळणार निकालाची माहिती!

प्रतिनिधी ५ एप्रिल

**खामगाव :** आरटीईअंतर्गत २५ टक्के प्रवेश प्रक्रियेत शासनाने अंतराच्या निकषात शिथिलता आणल्याने पालकांना मोठा दिलासा मिळाला असून, अर्जाची संख्या लक्षणीय वाढली आहे. प्रारंभी लागू असलेल्या एक किलोमीटर अंतराच्या मर्यादेमुळे अनेक विद्यार्थ्यांना अर्ज करता आले नव्हते; मात्र मुदतवाढीनंतर जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणात अर्ज दाखल झाले असून, एकूण अर्जाची संख्या ६,१७९ वर पोहोचली आहे.

जिल्ह्यात आरटीईअंतर्गत २,९३३ जागा उपलब्ध आहेत. प्राप्त अर्जाच्या तुलनेत प्रत्येक जागेसाठी सरासरी २ ते ३ विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा निर्माण झाली आहे. त्यामुळे यंदा प्रवेशासाठी चुरस वाढणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. दरम्यान, अर्जाची छाननी प्रक्रिया




पूर्ण झाली. असून, प्रवेशासाठीची सोडत (लॉटरी) सोमवार, दि. ६ एप्रिल २०२६ रोजी काढण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेत आयुक्त (शिक्षण) यांच्या हस्ते ही प्रक्रिया पार पडणार असून, तिचे थेट प्रक्षेपण ऑनलाइन माध्यमातून उपलब्ध करून दिले जाणार आहे. लॉटरीचा निकाल पालकांना एसएमएसद्वारे कळविण्यात येणार आहे.आरटीई प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज करण्याची अंतिम मुदत ३१ मार्च २०२६ होती.

या कालावधीत ६,१७२ पालकांनी आपल्या पाल्यांची नोंदणी पूर्ण केली. सुरुवातीला लागू असलेल्या अंतराच्या अटीमुळे अनेकांना अर्ज करता आला नव्हता; मात्र ही अट शिथिल होताच अर्जाची संख्या झपाट्याने वाढली. विशेषतः शहरी भागातील पालकांना याचा अधिक लाभ झाला आहे.आरटीई लॉटरीनंतर विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेला वेग येणार आहे.

लॉटरीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी संबंधित शाळेत निर्धारित कालावधीत जाऊन प्रवेश निश्चित करणे आवश्यक आहे. यासाठी जन्मदाखला, उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवासी पुरावा आदी आवश्यक कागदपत्रे वेळेत सादर करणे बंधनकारक राहणार आहे.

## विषारी औषध प्राशन करून शेतकऱ्याची आत्महत्या

**खामगाव :** तालुक्यातील अटाळी येथे एका ४३ वर्षीय व्यक्तीने विषारी औषध प्राशन करून आपली जीवनयात्रा संपवल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. विजय शांताराम घटे असे मृत व्यक्तीचे नाव असून, या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, विजय घटे यांनी आपल्या राहत्या घरी दारूच्या नशेत विषारी औषध प्राशन केले. प्रकृती खालावल्याचे लक्षात येताच नातेवाईकांनी त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांच्या शर्थीच्या प्रयत्नांनंतरही उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. याप्रकरणी मृताचे थोरले बंधू राजेश शांताराम घटे (४५) यांनी खामगाव ग्रामीण पोलीस स्टेशनला माहिती दिली. त्यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी कायमी मर्ग क्र. १५/२६, कलम १९४ BNSS (पूर्वीचे कलम १७४ सीआरपीसी) नुसार नोंद केली आहे. तपास पोहेकॉं बाळकृष्ण फुंडकर करीत आहे.

# युगधर्म पब्लिक स्कूलमध्ये उन्हाळी शिबिर उत्साहात संपन्न

प्रतिनिधी ५ एप्रिल

**खामगाव :** स्थानिक सूर्योदय एज्युकेशन सोसायटी, खामगाव द्वारे संचालित युगधर्म पब्लिक स्कूल, खामगाव येथे १५ दिवसांचे उन्हाळी शिबिर उत्साहात पार पडले. आज या शिबिराचा समारोप करण्यात आला. यावेळी शिबिरातील विद्यार्थ्यांनी आत्मसात केलेल्या विविध कौशल्यांचे प्रात्यक्षिक पालकांसमोर सादर केले.

युगधर्म पब्लिक स्कूल खामगाव ही शाळा शहरातील विद्यार्थ्यांसाठी सातत्याने विविध उपक्रमांच्या माध्यमातून व्यक्तिमत्व विकास आणि जिज्ञासू वृत्ती वाढविण्यासाठी प्रयत्नशील आहे. या शिबिरात खामगाव शहरातील ४ ते १० वयोगटातील सुमारे १२५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.



शिबिरादरम्यान विद्यार्थ्यांनी मनाचे श्लोक, इंग्लिश स्पीकिंग, योगा, ड्रॉइंग, फायरलेस कुकिंग, फोनिक्स, स्विमिंग, क्रीडा, नृत्य, मॅथ मॅजिक, हस्ताक्षर सुधारणा यांसारख्या विविध कौशल्यांचे प्रशिक्षण घेतले. या उपक्रमांसाठी खामगाव, शेगाव, अकोला व बुलढाणा येथील तज्ज्ञ मार्गदर्शकांनी मार्गदर्शन केले.

समारोप कार्यक्रमात शाळेचे अध्यक्ष गोपाल अग्रवाल यांनी पालकांना मार्गदर्शन करताना बदलत्या काळानुसार मुलांनी विविध कौशल्ये आत्मसात करणे गरजेचे असल्याचे सांगितले. तसेच मुलांच्या चेहऱ्यावरचा हास्य त्यांच्या आत्मविश्वासात वाढ करते, असेही त्यांनी नमूद केले.

शाळेचे प्राचार्य अनिरुद्ध आवचार यांनी प्रात्यक्षिक कार्यक्रमाला उपस्थित राहिल्याबद्दल सर्व पालकांचे आभार मानले तसेच शिबिरातील विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागाचे कौतुक केले.

या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी सौ. संगीता देशमुख, सौ. कल्पना वानखेडे, जिया मॅडम व कांचन मॅडम यांनी विशेष परिश्रम घेतले.

शिबिरादरम्यान विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या इंग्लिश स्पीकिंग प्रात्यक्षिकाचे पालकांनी विशेष कौतुक केले. खामगाव शहरात अशा आगळ्या-वेगळ्या उपक्रमांमुळे युगधर्म पब्लिक स्कूलचे सर्वत्र कौतुक होत आहे.

मुलांमध्ये साहसी खेळाची आवड निर्माण व्हावी तसेच त्यांना वेगळे वातावरण मिळावे या उद्देशाने शाळेकडून पुढाकार घेतला जातो. त्याला विद्यार्थी तसेच पालकांचा उत्तम प्रतिसाद मिळतो. अशात घेतलेल्या विविध प्रकारच्या उपक्रमात विद्यार्थी उत्साहाने सहभागी झाले होते.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
रविवार, दि. ५ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# कौलखेड परिसरात तांडव करणारे पाच अटकेत !

**सशस्त्र हल्ल्यात तीन जखमी ▶▶ खडकी शेत शिवारात लपून बसले होते आरोपी**

प्रतिनिधी ५ एप्रिल

**अकोला :** शनिवारी दुपारी कौलखेड परिसरात तांडव गँग च्या सहा युवकांनी तीन ठिकाणी सशस्त्र हल्ला करीत तिघांना गंभीर रित्या जखमी केले या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये एकच खळबळ उडाली असून महिलांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दोन दुचाकींवरून आलेल्या सहा तरुणांच्या टोळकयाने वेगवेगळ्या भागांतील तीन तरुणांवर धारदार शस्त्रांनी हल्ला केल्याने कौलखेड परिसरात घबराट पसरली, ज्यात तीन जण गंभीर जखमी झाले. हल्लेखोर हे कौलखेड परिसरातील 'तांडव गँग'चे सदस्य असल्याचे सांगितले जात असून, पोलीस त्यांचा सक्रियपणे शोध घेत आहेत. प्राथमिक माहितीनुसार, हल्लेखोरांमध्ये काही अल्पवयीन मुलांचाही समावेश होता. हल्लेखोर अमली पदार्थांचे व्यसनी असल्याचे म्हटले जात आहे. तांडव गँगच्या या गुंडगिरीमुळे पोलिसांच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कौलखेड चौक परिसरातील रहिवासी रवीकिरण गजानन ठाकरे हे त्यांच्या सर्विस सेंटरवर दुचाकी धुवत असताना, एका दुचाकीवरील चार आणि दुसऱ्या दुचाकीवरील दोन तरुणांनी त्यांच्यावर हल्ला केला, ज्यात त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. रवी किरण ठाकरे यांच्यावर झालेल्या या अचानक हल्ल्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या टोळीची दहशत एवढ्यावरच थांबली नाही तर त्यांनी अभिलाष हिंगे यांच्यावर हल्ला करून त्यांना जखमी केले. त्यानंतर, काही तासांतच, या टोळीतील सदस्यांनी एका कॅफेवर हल्ला करीत हरिओम रोठे नामक तरुणास जखमी करून पळ काढला. माहिती मिळताच, खदान पोलिस घटनास्थळी दाखल झाले. आणि घटनास्थळावरील तसेच आजूबाजूच्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासून हल्लेखोरांचा कसून शोध सुरू केला. घटनेची गांभीर्याने दखल घेत एसडीपीओ पथक, खदान पोलीस स्टेशन पथक आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पथकांनी आरोपींचा तपास सुरू केला होता आरोपी हे अटक चुकवण्याकरता खडकी शेत शिवार तालुका बार्शीटाकळी या परिसरात लपून बसले होते त्यामुळे त्यांना शोधणे आव्हानात्मक झाले होते तरीसुद्धा एलसीबीच्या पथकाने तांत्रिक विश्लेषण गोपनीय माहितीच्या आधारे नमूद आरोपींचा शोध लावून त्यांना ताब्यात घेतले त्यांच्या ताब्यातील तीन मोटरसायकली जप्त करण्यात आल्या अटक केलेल्या आरोपींमध्ये १)१८ वर्षीय कबीर सुनील बलखंडे राहणार न्यू घेता नगर, २) धनंजय संदीप ढाले व १९ वर्षे राहणार टीटीएम कॉलेज जवळ अकोला, ३) शिवम उर्फ शुभम संजय शेळके व १९ वर्षे राहणार हिंगणा नाका जवळ अकोला, ४) गौरव सुनील चव्हाण वय २० वर्षे राहणार खडकी तालुका बार्शी टाकळी, ५) एक विधी संघर्षग्रस्त बालक यांचा समावेश असून काही आरोपींवर यापूर्वीसुद्धा गुन्हे दाखल आहेत पुढील कारवाई करता सर्व आरोपींना पोलीस स्टेशन खदान यांच्या ताब्यात देण्यात आले या घटनेत सामील असलेल्या विधी संघर्षग्रस्त बालकाच्या पालकांना सूचना देऊन चौकशी कामी बोलवण्यात येणार आहे तसेच जरी अल्पवयीन असते तरी जे जे एक्ट नुसार माननीय न्यायालयाला तपास अधिकारी कडून त्यांचे विरुद्ध प्रौढ म्हणून खटला दाखल करण्याची विनंती केली जाईल.



### या हल्ल्यांमागे जुने वैर हे कारण आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अमली पदार्थांच्या आहारी गेलेल्या तांडव गॅंग च्या सदस्यांच्या वाढत्या उपद्रवामुळे, काही महिन्यांपूर्वी तिथल्या नागरिकांनी त्यांना मारहाण करून परिसरातून धिंड काढली होती. या तरुणांवरील हे हल्ले याच वैराचा परिणाम असल्याचे मानले जाते. हल्लेखोरांच्या अटकेनंतरच त्यांच्या या धुमाकुळामागील खरे कारण उघड झाले आहे.

### दादागिरी करणाऱ्या टोळीचा बिमोड करण्याची गरज

शहरातील अनेक परिसरात बेरोजगार व दादागिरी करणाऱ्या युवकांच्या टोळ्या निर्माण झाल्या आहेत. दारू व गांजा पिऊन धुमाकूळ घालने, दादागिरी करणे, परिसरातील व्यावसायिकांकडून खंडणी उकळणे, भर रस्त्यावर आपल्या गॅंगच्या सदस्यांचा वाढदिवस साजरा करणे, रस्त्यावरच फटाके फोडणे, दारू पिणे, छेडछाड करणे, भर वेगात कर्कश हॉर्न वाजवीत ट्रिपल सीट वाहन पळवणे, छोट्या मोठ्या कारणांवरून हातात शस्त्र घेत धुमाकूळ घालने आदी प्रकारांमध्ये वाढ झाली आहे. अशा युवकांच्या टोळयांवर पोलिसांनी कड़क कारवाई करीत या टोळयांचे कंबरडे मोडून काढले पाहिजे अशी मागणी शहरवासी करीत आहेत

## सम्राट अशोक जयंतीनिमित्त 3500 स्क्वेअर फुटाची भव्य रांगोळी; अनोखा उपक्रम



प्रतिनिधी ५ एप्रिल

**अकोला :** सम्राट अशोक यांच्या २,३३० व्या जयंतीचे औचित्य साधून शहरात लक्षवेधी उपक्रम राबवण्यात आला. तिक्ष्णगत मल्टिपरपझ वेलफेअर सोसायटी, अकोलाच्या पुढाकाराने पंचशील नगर व न्यू तापडिया नगर, खरप रोड परिसरातील चक्रवर्ती सम्राट अशोक प्रवेशद्वारासमोर ३५०० स्क्वेअर फूट क्षेत्रफळाची भव्य रांगोळी साकारण्यात आली. नागरिकांचे लक्ष वेधून घेतले.

या आकर्षक रांगोळी द्वारे सम्राट अशोक यांचे जीवनकार्य, बौद्ध धम्माच्या प्रसाराची तसेच शांतता, अहिंसा आणि मानवतेचा संदेश प्रभावीपणे देण्यात आला. आकर्षक रंगसंगती आणि कलात्मकतेचा संगम असलेल्या या रांगोळीने परिसरात औत्सुक्य निर्माण केले.

स्थानिक नागरिक, तरुणाई आणि महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या उपक्रमाचे कौतुक केले. अनेकांनी रांगोळीसमोर छायाचित्रे काढत या कलाकृतीचा आनंद घेतला. मोठ्या स्क्रीनवर ड्रोन द्वारे रांगोळीचे प्रेझेंटेशन करण्यात आले. शनिवारी रात्री उशिरापर्यंत कार्यक्रम सुरू होता.समाजात थोर व्यक्तीविषयी जागरूकता निर्माण करणे आणि सांस्कृतिक मूल्ये जपणे हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले. अशा उपक्रमांमुळे शहरातील सामाजिक एकात्मता अधिक दृढ होत असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

## आखतवाडा परिसरात विद्युत पुरवठा विस्कळीत

प्रतिनिधी ५ एप्रिल

**अकोला:** मौजे आखतवाडा, शामाबाद, अनकनाडी परिसरात विद्युत पुरवठा विस्कळीत झाला आहे. तो सुरळीत व्हावा अशी ग्रामीण भागातील नागरिकांची मागणी आहे.

या भागाला महावितरणच्या आपातापा विद्युत उपकेन्द्रावरुन विद्युत पुरवठा करण्यात येत असला तरी या गावात विद्युत पुरवठा व्यवस्थित होत नाही. वीज पुरवठा सारखा खंडीत होतो. ऐन कार्यक्रमाच्या वेळी वीज नसते. तसेच रात्री वीज नसेल तर खूप गैरसोय होते. महावितरण यंत्रणेने याकडे लक्ष द्यावे आणि समस्या सोडवावी अशी मागणी आहे.

## अकोला जिल्ह्यातील 931 हेक्टरला अवकाळीचा फटका !

प्रतिनिधी ५ एप्रिल

**अकोला :** जिल्ह्यात मागील काही दिवसांपासून सुरू असलेल्या अवकाळी पावसामुळे आतापर्यंत एकूण ९३१ हेक्टरवरील पिकांना फटका बसला आहे. तसेच २ एप्रिलला झालेल्या अवकाळी पावसामुळे जिल्ह्यातील अकोला तालुका २६५ हेक्टर तर बार्शिटाकळी तालुक्यातील ३ हेक्टरवरील पिकांना फटका बसला असल्याची माहिती अकोला जिल्हा प्रशासनामार्फत देण्यात आली आहे. तर दुसरीकडे संपूर्ण राज्यातच अवकाळी पावसाने धुमाकूळ घातला आहे. आधीच संकटात असलेल्या शेतकऱ्यांच्या मानगुटीवरून अद्यापही अवकळीचे संकट उतरले नसल्याचे दिसून येत आहे. २ एप्रिलला अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची आकडेवारी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून प्राप्त झाली असून, अकोला तालुक्यातील २६५ हेक्टर पिकाला या अवकाळीचा दणका बसला असून, यात कांदा, गहू, भाजीपाला या पिकांचा समावेश आहे.

तसेच बार्शिटाकळी तालुक्यातील भेंडगाव येथील शेतकरी रामेश्वर मारोती गावंडे हे ३ एप्रिलला अंगावर वीज पडल्यामुळे गंभीर जखमी झाले होते. त्यांच्यावर अकोला येथील खासगी रूग्णालयात उपचार सुरू त्यांच्या प्रकृतीत सुधारणा झाली आहे.तसेच ३ हेक्टर क्षेत्रावरील कांदा पिकाचेही नुकसान तालुक्यात झाले आहे. या सततच्या नैसर्गिक संकटामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे.

## अल्पवयीन मुलीवर अत्याचार प्रकरणातील आरोपीस पोक्सो कायद्यान्वये ५ वर्ष कारावासाची शिक्षा

प्रतिनिधी ५ एप्रिल

**अकोला:** पिंजर पोलिस स्टेशन अंतर्गत अल्पवयीन मुलीवर अत्याचार प्रकरणात न्यायालयाने आरोपीस पोक्सो कायद्यान्वये ५ वर्ष कारावासाची शिक्षा आणि एक हजार रुपये दंड ठोठावला. अकोला जिल्हा व सत्र न्यायाधीश यांनी ४ एप्रिल रोजी निकाल दिला.

पिंजर हद्दीतील ग्राम कासमार येथे ०९/०७ / २०१७रोजी फिर्यादी हिने तिच्या अल्पवयीन मुलीवर घडलेल्या घटनेची तक्रार दिली होती. घटनेतील आरोपी प्रल्हाद उत्तम हजारे रा कासमार, पो. स्टे. पिंजर ता. बार्शी टाकळी जि. अकोला याने पिडीता हिचा विनयभंग करून तिच्यावर लैंगीक अत्याचार केला आहे. त्यावरून आरोपी विरूध्द पोलिस स्टेशन पिंजर येथे कलम ३५४, ३७६ (२) आय, ३२३,५०६, भादवि व सह कलम ४,८,१०,१२ पोक्सो कायदा प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचा तपास पोलिस उपनिरीक्षक मनोज वासाडे यांनी करून दोषारोप पत्र न्यायालयात दाखल केले होते.

या प्रकरणी ०६ साक्ष पुरावे तपासले व फिर्यादी, पिडीता तसेच इतर साक्षीदारांच्या साक्षी ग्राहय धरून जिल्हा व सत्र न्यायाधीश-०१, अकोला यांनी गुन्हयातील आरोपी प्रल्हाद उत्तम हजारे रा. कासमार, ता. बार्शी टाकळी जि. अकोला यास कलम ३५४., भादविच्या कलमान्वये दोषी ठरवुन ०१ वर्ष सक्तमजुरी व ५०० रू दंडाची शिक्षा सुनावली आहे. दंड न भरल्यास १५ दिवसाची साधी कारावासाची शिक्षा सुनावली आहे. तसेच पोक्सो कायदयाचे कलम ८,१० अंर्तगत ०५ वर्ष सक्त मजुरी शिक्षा व १००० रुपये दंडाची शिक्षा तसेच दंड न भरल्यास ०१ महिना साधी कैद अशी शिक्षा सुनावली. सरकारी पक्षाची बाजु सरकारी अभियोक्ता अकोटकर यांनी मांडली. पिंजर येथील पैरवी अंमलदार सहा. पोलिस उपनिरीक्षक प्रकाश खडे व सी.एम.एस येथील सहा. उपनिरीक्षक फजलुर रहेमान काझी यांनी कोर्ट पैरवी म्हणुन कामकाज पाहिले.

पोलिस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलिस अधीक्षक चंद्रकांत रेडडी, उपविभागीय पोलिस अधिकारी वैशाली मुळे व ठाणे प्रभारी दराडे यांनी या प्रकरणात मार्गदर्शन केले.

## अतिक्रमणधारकांसाठी गणेश चौकसे यांचा एल्गार !

प्रतिनिधी ५ एप्रिल

**खामगांव:** राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष गणेश चौकसे यांनी अतिक्रमणधारकांचे अतिक्रमण भर पावसाळ्यामध्ये २७ व २८ जून २०२५ मध्ये न्यायालयाचे आदेश असल्याचे कारण देऊन नगरपरिषदेने काढले होते. अतिक्रमण धारकांच्या हे दोन दिवस नेहमी स्मरणात राहतील. चौकसे यांनी आता लढा देण्याची तयारी केली आहे.



शेकडो अतिक्रमणधारकांना भर पावसाळ्यात असह्य असा त्रास सहन करावा लागला तसेच त्यांच्या परिवारावर उपासमारीची वेळ आली होती . तेव्हापासून अजूनही बरेच अतिक्रमणधारक आजही रोजी रोटीशी भांडत आहेत. न भूतो न भविष्यती असे मोठे नुकसान त्यावेळेस गरीब अतिक्रमण धारकांचे झाले. त्यांचे आर्थिक उत्पन्न वार्षिक हजारोच्या घरात आहे. त्यांच्याकडून पाच लाख रुपये अनामत रक्कम कशी जमा होईल.


या गोष्टीचा सहानुभूतीपूर्वक विचार करून अनामत रक्कम पाच लाख रुपये रद्द करून त्याऐवजी ५०००० रुपये करावी तसेच दरमहा दुकानाचे भाडे ६००० रुपया ऐवजी १००० रुपये प्रतिमाह करावा. ज्या अतिक्रमण धारकांची दुकाने तोडल्या गेली त्यांनाच नवीन दुकान देताना प्राधान्य द्यावे. जर ही अनामत रक्कम कमी केली नाही तर निश्चितच ही दुकाने श्रीमंतांच्या घशात जातील.

## उन्नती व्हेईकल प्रायव्हेट लिमिटेड रेनॉल्ट शोरूममध्ये न्यू डस्टर कारचे शानदार लाँचिंग

**लाँचिंग कार्यक्रमाला शहरातील मान्यवर अतिथी आणि कार प्रेमींची उपस्थिती**

प्रतिनिधी ५ एप्रिल

**अकोला:** कार शौकीनांमध्ये ज्या गाडीबद्दल कमालीची उत्सुकता होती, त्या 'न्यू डस्टर' कारचे अखेर शहरातील उन्नती व्हेईकल प्रायव्हेट लिमिटेड रेनॉल्ट शोरूममध्ये शानदार लाँचिंग करण्यात आले. या सोहळ्याला अनेक मान्यवर अतिथींनी उपस्थिती लावली होती. आधुनिक सुविधांनी सज्ज असलेली ही कार आता ग्राहकांसाठी लवकरच डिलिव्हरीसाठी उपलब्ध होईल, अशी माहिती यावेळी देण्यात आली.३ एप्रिल रोजी अकोला शहरातील उन्नती व्हेईकल प्रायव्हेट लिमिटेड रेनॉल्ट शोरूममध्ये न्यू डस्टर कारचा भव्य अनावरण सोहळा पार पडला. नव्या डस्टरने आपला जुना 'रफ अँड टफ' अंदाज कायम राखला




असून, आता ही कार पूर्वीपेक्षा अधिक स्टायलिश आणि आकर्षक दिसते. गाडीच्या पुढच्या भागाचा विचार केला तर मजबूत ग्रिल, फ्लॅट बोनेट आणि मध्यभागी असलेली डस्टरची चमकदार बॅजिंग या कारला ' ग्रेसिव्ह लूक' देते.गाडीमध्ये टर्न इंडिकेटरसह स्लिम एलईडी हेडलॅम्प्स आणि डीआरएल देण्यात आले आहेत. मागील बाजूस एलईडी टेल लाईटसह 'कनेक्टेड लाईट बार' गाडीच्या सौंदर्यात भर घालतात. मोठे अलॉय व्हील्स, हाय ग्राऊंड क्लीयरन्स आणि सी-पिलरमध्ये लपवलेले डोअर हँडल्स यांमुळे गाडीला एक मस्कुलर आणि स्पोर्टी लूक मिळाला आहे. ग्राहकांच्या पसंतीचा विचार करून ही एसयूव्ही सहा आकर्षक रंगांमध्ये उपलब्ध करून देण्यात आली आहे. कंपनीचे सेल्स मॅनेजर सागर बोराले यांनी माहिती दिली की, जर तुम्ही एक दमदार, स्टायलिश आणि फिचर्सनी परिपूर्ण एसयूव्ही घेण्याचा विचार करत असाल, तर न्यू डस्टर हा एक उत्तम पर्याय ठरू शकतो. या गाडीत विविध इंजिन ऑप्शन्स आणि प्रगत फिचर्स देण्यात आले असून ग्राहकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.या प्रसंगी रेनॉल्ट कंपनीचे नागपूर विभागाचे हेड चेतन सर, आरटीओ अधिकारी गाईंदे मॅडम, शहरातील प्रतिष्ठित नागरिक आणि कार शौकीन मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शहरात मयूर नृत्याने फेडले डोळ्याचे पारणे

**उपविभागीय अधिकारी यांच्या निवासस्थानी मोराचे लक्षवेधक नृत्य**

सुरेश राठोड ५ एप्रिल

**अकोला:** शनिवारी सकाळी अकोला येथील उपविभागीय अधिकारी डॉ. शरद जावळे यांच्या शासकीय निवासस्थानी मोराचे मनमोहक नृत्य पाहायला मिळाले. परिसरातील प्रसन्न वातावरणात मोराने पिसारा पसरवून विस्तार नृत्य केले. मयूर नृत्य मनमोहक होते.



अकोला शहरात गेल्या काही दिवसांपासून पावसाळी वातावरण निर्माण झाले आहे. शनिवारी सकाळी आल्हाददायक वातावरणात मोराने रंगीबेरंगी पंख फुलवून केलेले नृत्य पाहून उपस्थित भारावून गेले. निळ्या, हिरव्या आणि सोनेरी रंगात सजलेला त्याचा पिसारा सूर्यकिरणांत अधिकच आकर्षक दिसत होता. या अनोख्या क्षणाचे साक्षीदार ठरलेले उपविभागीय अधिकारी डॉ. शरद जावळे व त्यांच्या परिवारातील सदस्यांनी मोबाईलमध्ये हा नजारा टिपला. शहराच्या गजबजाटात अशा प्रकारे निसर्गाचे दर्शन घडणे ही दुर्मीळ बाब असल्याची प्रतिक्रिया डॉ. शरद जावळे यांनी व्यक्त केली. मोराचे नृत्य पावसाच्या आगमनाचे संकेत मानले जात असून, पर्यावरणातील समृद्धी आणि जैवविविधतेचे प्रतीक मानले जाते.

## गाडगे नगर परिसरातील तरुणीला पळवून नेणाऱ्या तरुणाला तामसी गावातून अटक

**पोलिसांच्या विशेष पथकाने आरोपीचा छडा लावला**

प्रतिनिधी ५ एप्रिल

**अकोला:** २१ डिसेंबर रोजी जुने शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गाडगे नगर परिसरातील एका तरुणीला फूस लावून पळवून नेणाऱ्या आरोपीला पोलिसांनी बाळापूर तालुक्यातील तामसी गावातून अटक केली आहे.

२५ डिसेंबर २०२५ रोजी गाडगे नगर येथील एका महिलेने जुने शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. तक्रारीनुसार, २१ डिसेंबरच्या रात्री ८:३० वाजताच्या सुमारास आरोपीने त्यांच्या मुलीला घरातून पळवून नेले होते. पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला असता, राहुल राष्ट्रपाल वाकोडे असे आरोपीचे नाव निष्पन्न झाले. मुलीच्या फोनवरील संभाषणावरून पोलिसांनी या प्रकरणावर बारीक लक्ष ठेवले होते. तपासात असे समोर आले की, राहुलने तरुणीला लग्नाचे किंवा इतर आमिष दाखवून बहलावून पळवून नेले आहे.आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलिसांचे एक पथक पुणे आणि मुंबईला रवाना झाले होते. मात्र, आरोपी वारंवार आपले ठिकाण बदलत असल्याने तो पोलिसांच्या हाती लागत नव्हता. गेल्या अनेक महिन्यांपासून तो पोलिसांना चकमा देत होता.३ एप्रिल रोजी जुने शहर पोलीस पथकाला गुप्त माहिती मिळाली की, आरोपी राहुल हा बाळापूर तालुक्यातील तामसी गावात लपून बसला आहे. माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ सापळा रचून त्याला ताब्यात घेतले.

## वातावरणातील बदल प्रकृतीसाठी अयोग्य

प्रतिनिधी ५ एप्रिल

**अकोला:** ऐन उन्हाळ्यात पाऊस होत आहे. हवामानात झालेला बदल प्रकृतीच्या तक्रारी वाढवत आहे. अंगदुखी, डोकेदुखी, ताप अशी लक्षणे जाणवत आहे. तसेच सर्दी, खोकला देखील त्रस्त करीत आहे. शासकीय तसेच खाजगी रुग्णालयात रूग्ण मोठ्या प्रमाणात दिसून येतात. मध्ये ४२ अंश सेल्सिअस पर्यंत पारा पोहोचला. आणि आता पावसाळी वातावरण तयार झाले आहे. दररोज सायंकाळी पावसाची शक्यता असते. आणखी काही दिवस अशी स्थिती राहील अशी शक्यता आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क** – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK